DAILY THANEVAIBHAV RNI REGD NO. 27878/ 75, POSTAL NO. THC/186/2018-2021

कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अंबरनाथ-बदलापूर, भिवंडी, उल्हासनगर, मुरबाड, शहापूर.

आतील पानांत

"गर्दी करणारे राजकीय, धार्मिक कार्यक्रम टाळा", मुख्यमंत्र्यांची पक्ष-संघटनांना कळकळीची विनंती

पात्र लोकांना लसीचा पहिला डोस देणारं हिमाचल प्रदेश हे पहिलं राज्य - पंतप्रधान मोदी

शहरीकरणाने पुसली पूररेषा

अग्रलेख / 5

# ठाणेवैभव

www.thanevaibhav.in

ठाणे जिल्ह्याचे सर्वाधिक खपाचे परिपूर्ण दैनिक | इष्ट ते छापणार | संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ




कल्याण-डोंबिवली वैभव विशेष

>>पान ५ वर

भारतीय सौर दिनांक भाद्रपद १६ शके १९४४ | वर्ष ४७ | अंक १४ | मंगळवार ७ सप्टेंबर २०२१ | पाने ६ | रु. ४

संपादक : मिलिन्द बल्लाळ

# कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांच्या वाहनांची टोलमुक्ती

## सार्वजनिक बांधकाम मंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

**मुंबई: गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी सर्व आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली असून कोकणात जाणाऱ्या भाविकांच्या वाहनांना पथकरातून सवलत देण्यात येत असल्याची घोषणा सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. या पथकर सवलतीसाठी गणेशभक्तांच्या वाहनांना स्टीकर्स तातडीने उपलब्ध करुन देण्याच्या सूचनाही श्री. शिंदे यांनी दिल्या आहेत.**





आगामी गणेशोत्सव कालावधीत कोकणात जाणाऱ्या भाविकांच्या दृष्टीने आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, गृहराज्यमंत्री (ग्रामीण) शंभुराज देसाई नगरविकास विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार, अपर पोलीस महासंचालक (महामार्ग वाहतूक) डॉ. भूषणकुमार उपाध्याय, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव श्री. देबडवार आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कोकणात गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून कोकणात जाणारे सर्व रस्ते, महामार्ग सुस्थितीत असणे गरजेचे आहेत. भाविकांचा प्रवास सुलभ व्हावा यासाठी पनवेल, पेण, महाड रस्ता, सातारा, भुईंज,शेंद्रे तसेच कराड-पाटण चिपळूणमार्गे कोकणात जाणारा महामार्ग, मुंबई-गोवा महामार्ग, वाकण-पाली-खोपोली मार्ग, सिंधुदुर्गातील वागदे-

>>पान २ वर

# बेळगाव महापालिकेवर कमळ फुललं, भाजपची एकहाती सत्ता

**बेळगाव :** बेळगाव महानगरपालिका निवडणुकीचा निकाल आज घोषित झाला. या निकालात भाजपनं निर्विवाद वर्चस्व सिद्ध केलं आहे. एकहाती सत्ता काबिज करत बेळगाव महापालिकेवर कमळ फुलवलं आहे.

या निवडणुकीत भाजपनं 35, काँग्रेसनं 10, अपक्ष 8, महाराष्ट्र एकीकरण समिती चार आणि एमआयएम एक असे उमेदवार विजयी झाले आहेत. भाजपाला जनतेने स्पष्ट बहुमताचा कौल देत सत्ता सोपवली आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीला या निवडणुकीत धक्कादायक पराभवाचा सामना करावा लागला आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीचे 32 सदस्य आधीच्या सभागृहात होते. तर कन्नड उर्दू गटाचे 36 सदस्य होते.

58 जागेवर निवडणूक असली तरी बेळगाव महापालिकेत महापौर निवडीच्या वेळी खासदार आणि आमदारांना मतदानाचा अधिकार आहे. सध्या बेळगावमध्ये


>>पान २ वर

# इमारतीवर कारवाई न करण्यासाठी अधिकाऱ्यांनी लाखो रुपये उकळले ?

### व्हिडीओ सीसीटीव्हीत कैद; आयुक्त चौकशी करणार

**कल्याण :** डीपी रस्त्यात बाधा येणाऱ्या सहा मजली बेकायदा इमारतीवर कारवाई न करण्यासाठी पालिकेच्या संबधित अधिकाऱ्यांनी लाखो रुपये उकळूनही या बेकायदेशीर इमारतीवर पालिकेने नुकतीच काही दिवसांपूर्वी कारवाई केली होती. या प्रकरणी बांधकाम व्यावसायिकाने उपायुक्त व प्रभाग क्षेत्र अधिकाऱ्यांनी लाखो रुपये घेतल्याचा गंभीर आरोप करीत भांडाफोड केला व अधिकारी पैसे घेत असल्याच्या व्हिडिओची सीसीटीव्ही फुटेज उघड केल्याने पालिकेच्या संबधित अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

>>पान २ वर




# बाल शिवाजी उद्यानात कचऱ्याचा प्रकल्प; मनसेचा विरोध

**उल्हासनगर:** उल्हासनगर येथील बाल शिवाजी या उद्यानात मनपाद्वारे कचऱ्यापासून खतनिर्मिती प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहर संघटक मैनुदिन शेख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कडाडून विरोध केला आहे. लवकरात-लवकर या प्रकल्पाचे काम बंद करण्यात यावे अन्यथा आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे.

उल्हासनगर महानगर पालिकेच्या, पॅनल क्रमांक-1 येथील धोबीघाट परिसरात बाल शिवाजी उद्यान कित्येक वर्षांपासून देखभाल अभावी दुरावस्थेत होते. मनसेच्या पाठपुराव्या नंतर या उद्यानाचे मनपा प्रशासनाने सुशोभीकरण केले लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांसाठी एक सुंदर

>>पान २ वर

# स्थायी समितीत सर्वपक्षीय 10 सदस्यांचे राजीनामे

## निवडणुकीत अंतर्गत गटबाजी नको म्हणून नवीन सदस्यांना संधी

**ठाणे:** आगामी ठाणे महापालिकेच्या निवडणुकीत पक्षांतर्गत नाराजीचा फटका बसू नये म्हणून आज स्थायी समितीत सर्वपक्षीय 10 सदस्यांनी राजीनामा दिला आहे. यात शिवसेना सहा, भाजपा तीन आणि राष्ट्रवादीच्या एका सदस्याचा समावेश आहे. या जागांवर नवीन सदस्य नियुक्त करण्यात येणार आहेत.

सोमवारी झालेल्या महासभेत शिवसेनेकडून स्वतः महापौर नरेश म्हस्के, सदस्य राम रेपाळे, नरेश मणेरा, मालती पाटील, विमल भोईर आणि गुरमुखसिंग




स्यान यांनी राजीनामे दिले. भाजपच्या वतीने कृष्णा पाटील, भरत चव्हाण आणि नम्रता कोळी तर राष्ट्रवादीचे शानु पठाण यांनी राजीनामे दिला. शिवसेनेच्या वतीने

>>पान ६ वर

# गॅस सिलेंडरचे दर नऊशे रुपयांवर

## राष्ट्रवादी काँग्रेसने मानले मोदींचे खोचक आभार


**ठाणे:** सन 2014 मध्ये 410 रुपये असलेले घरगुती गॅस सिलिंडरचे दर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच प्रयासामुळे 889.50 रुपयांवर गेले आहेत, अशी खोचक टीका करत राष्ट्रवादी काँग्रेसने ठाणे शहरात आभाराचे फलक झळकवले आहेत.

सन 2014 मध्ये देशात घरगुती सिलिंडरचे दर 410 रुपये होते. आता हेच दर 889.50 रुपयांवर गेले आहेत. एकीकडे गणेशोत्सव तोंडावर असतानाच गॅसचे दर वाढल्याने सामान्यजनांचे कंबरडे मोडले आहे. त्याचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने हे अनोखे फलक लावून दरवाढीबद्दल चक्क मोदींचेच आभार मानले आहेत.

या संदर्भात शहराध्यक्ष माजी खासदार आनंद परांजपे म्हणाले, राष्ट्रवादीच्या वतीने

>>पान २ वर



# भिवंडीतील कारीवली रस्त्याची दुरावस्था; लाखो रुपयांचा चुराडा



**भिवंडी:** भिवंडीतील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांची सध्या दुरावस्था झाली असून शहराला जोडणाऱ्या कारीवली ग्राम पंचायतीच्या मुख्य रस्त्याची देखील मोठी दुरावस्था झाली आहे. या रस्त्यावर मोठंमोठे खड्डे पडले असल्याने या रस्त्यावरून प्रवास करतांना प्रवाशांसह स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

भिवंडी शहरालगत असलेल्या कारीवली ग्रामपंचायत येथील मुख्य रस्त्याच्या बांधणीसाठी दोन वर्षांपूर्वी सुमारे एक कोटी रुपयांचा निधी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मंजूर झाला होता. त्यानुसार मागील वर्षी जून महिन्यात या रस्त्यावर सुमारे एक कोटी रुपये खर्च करून हा रस्ता बांधण्यात आला होता. मात्र त्यानंतर काही दिवसांनीच या रस्त्याची दुरावस्था होण्यास सुरुवात झाली होती. आता या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने रस्त्याच्या ठेकेदारासह पंचायत समिती बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व ठेकेदारांवर कारवाई करावी, अशी मागणी कारीवली ग्रामपंचायतमधील स्थानिक नागरिकांनी वारंवार शासकीय यंत्रणेकडे केली आहे.

विशेष म्हणजे या रस्त्यासाठी एक कोटींचा खर्च मजूर करण्यात आला होता आणि तो संपूर्ण निधी देखील ठेकेदाराला पंचायत समितीच्या बांधकाम विभागाच्या शिफारशीनुसार अदा देखील केली असल्याची माहिती कारीवली गावातील स्थानिक नागरिकांनी दिली आहे. ठेकेदारांवर कारवाई करावी यासंदर्भात पंचायत ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद, जिल्हाधिकारी कार्यालायसह अनेक शासकीय विभागांना लेखी तक्रारी केल्या आहेत. मात्र ठेकेदारांचे राजकीय पुढाऱ्यांशी जवळीक असल्याने ठेकेदारावर व अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नसल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली आहे.

सध्या या रस्त्याची अक्षरशः दुरावस्था झाली असल्याने आता हा रस्ता नक्की कोण दुरुस्त करणार असा प्रश्न स्थानिक नागरिक विचारत आहेत.

या रस्त्यासंदर्भात अधिक माहितीसाठी भिवंडी पंचायत समितीच्या बांधकाम विभागाचे शाखा अभियंता दत्तु गीते यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

# कल्याण-डोंबिवलीत ३८नवे रुग्ण




**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात आज 38 कोरोना रुग्णांची नोंद करण्यात आली असून गेल्या 24 तासांत 61 रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. कोरोनामुळे आज एक मृत्यू झाला आहे.

आजच्या या 38 रुग्णांमुळे पालिका क्षेत्रातील रुग्णांची एकूण संख्या एक लाख 41 हजार 274 झाली आहे. यामध्ये 621 रुग्ण उपचार घेत असून एक लाख 37 हजार 918 रुग्णांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. आतापर्यंत 2735 जणांचा कोरोनामुळे मृत्यू झाला आहे.

आजच्या 38 रुग्णांमध्ये कल्याण पूर्व -10, कल्याण पश्चिम नऊ, डोंबिवली पूर्व-15, डोंबिवली पश्चिम दोन तर मांडा टिटवाळा येथील दोन रुग्णांचा समावेश आहे.

# विठ्ठलवाडी रेल्वे स्थानकातून सुटणार होम ट्रेन



**उल्हासनगर :** कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी विठ्ठलवाडी रेल्वे स्थानकाची आज पाहणी केली. यावेळी रेल्वे स्थानक परिसरात मुबलक जागा असल्याने भविष्यात विठ्ठलवाडी रेल्वे स्थानकातून होम ट्रेन सोडणार असल्याची योजना असल्याचे त्यांनी सांगितले.

कल्याण आणि उल्हासनगर ह्या दोन महानगरपालिकांमध्ये येणाऱ्या विठ्ठलवाडी स्थानकाचा म्हणावा तसा विकास झालेला नाही. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नाने दोन पादचारी पूल दोन टोकांना बांधण्यात आले आहेत. त्यांच्या कामाची आज खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मध्य रेल्वे व्यवस्थापकांच्या उपस्थित आज पाहणी केली. यावेळी कल्याण शेवटच्या पादचारी पुलाला स्वयंचलित जिने लावण्याचे काम चालू आहे. तसेच हा पूल तिसरी आणि चौथी रेल्वे लाईन टाकण्याचे काम सुरु झाल्यानंतर उल्हासनगर बाजूला ही उतरविला जाणार असल्याचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी सांगितले. तसेच वर्षानुवर्षे तिकीट खिडकी नसल्याने पूर्वच्या नागरिकांना पश्चिमेला यावे लागत होते. आता दोन्ही बाजूला तिकीट खिडकी सुरु झाली आहे. तसेच पश्चिमेच्या बाजूला बगीचा बनविण्याचे काम देखिल सुरु झाले असून रेल्वे स्थानकावर स्वयंचलित जिना उतरविण्यासाठी जागा निश्चित करण्याबाबत अभियंत्यांना यावेळी खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी कडक शब्दात निर्देश दिले.

यावेळी शहरप्रमुख राजेंद्र चौधरी, नगरसेवक धनंजय बोडारे, कुलवंतसिंग सोहता, दिलीप गायकवाड, बाळा श्रीखंडे, राजेंद्र साहू, शिवाजी जावळे, दिपक साळवे, सुरेश सोनवणे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

विठ्ठलवाडी रेल्वे स्थानक परिसरात रेल्वे रुळाजवळ घरे आहेत. तिसरी आणि चौथी रेल्वेलाईन टाकताना शेकडो परिवार उद्ध्वस्त होणार आहेत. ही बाब खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या लक्षात आणून दिल्यावर त्यांनी सांगितले की कायद्याने जमीन हस्तांतरण केले जाणार असून कोणालाही बेघर केले जाणार नाही.

# ठाण्यात फेरीवाल्यांवर धडक कारवाई सुरुच



**ठाणे:** ठाणे महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांच्या आदेशान्वये शहरातील फेरीवाल्यांवर धडक कारवाईची मोहिम सुरुच असून आज शहरातील विविध ठिकाणी फेरीवाल्यांवर कारवाई करून सामान जप्त करण्यात आले.

या कारवाई अंतर्गत नौपाडा-कोपरी प्रभाग समितीमधील अलोक हॉटेल, गावदेवी, तीन हात नाका, राममारुती रोड, तलावपाळी दुकानांसमोरील सामान जप्त करण्यात आले. स्टेशन परिसर, जुनी महापालिका, सुभाष पथ, जांभळी नाका व कोर्ट नाका येथील 20 फळांच्या पाट्या जप्त करण्यात आल्या. तर दौलत नगर ते भाजी मार्केट, सिद्धार्थ नगर, स्टेशन रोड व मंगला स्कूल या परिसरातील फेरीवाल्यांवरही कारवाई करण्यात आली. तसेच प्रेम नगर येथील दोन प्लास्टिक शेड काढून एक वजन काटा जप्त करण्यात आला. कळवा प्रभाग समितीमधील कळवा स्टेशन रोड ते कळवा भाजी मार्केट व खारेगाव मार्केट परिसरातील पथ विक्रेते व फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात आली.

उथळसर प्रभाग समितीमधील पाचपाखाडी ठामपा मुख्यालय समोर व खोपट रोड अभिषेक हॉटेल जवळील अनधिकृत फेरीवाले व हातगाड्यांवर कारवाई करून अनाधिकृत पोस्टर्स काढण्यात आले. तसेच मुंब्रा प्रभाग समितीमधील टीएमसी हॉस्पिटल कंपाऊंड वॉल लगत उभारलेली झोपडी तोडण्यात आली. कळवा प्रभाग समिती विटावा गाव परिसरातील मुख्य रस्ता व पदपथावरील बॅनर्स काढण्यात आले. यासोबतच दिवा स्टेशन रोड, दिवा आगासन रोड, दातिवली रोड व मुंब्रादेवी कॉलनी रस्त्यावरील अनधिकृत फेरीवाले तसेच फुटपाथवरील अतिक्रमण हटविण्यात आले. यामध्ये चार हातगाड्या, 02 लोखंडी स्टॉल्स जप्त करण्यात आले. तर तीन अनधिकृत शेड तोडून 50 अनधिकृत बॅनर्स काढण्यात आले.

ही कारवाई अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभागाच्या उप आयुक्त अश्विनी वाघमळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त शंकर पाटोळे, महेश आहेर, सागर साळुंखे आणि अलका खैरे यांनी अतिक्रमण विभागाचे कर्मचारी आणि पोलीस यांच्या साहाय्याने केली.

# मुख्यमंत्र्याच्या उपस्थितीत कोपर पुलासह आठ प्रकल्पांचा लोकार्पण सोहळा

**कल्याण :** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मंगळवारी डोंबिवली पूर्व पश्चिम जोडणाऱ्या कोपर पुलासह महानगरपालिका क्षेत्रातील विविध उपक्रमांचे ऑनलाईन लोकार्पण केले जाणार आहे.

डोंबिवली पूर्व पश्चिम जोडणारे कोपर पूल सप्टेंबर 2019 रोजी वाहतुकीसाठी बंद करण्यात आले असले तरी या पुलाच्या कामासाठी ठेकेदारच मिळत नसल्याने रखडलेले पुलाचे काम पालिका प्रशासनाने सव्वा वर्ष इतक्या विक्रमी वेळेत पूर्ण करत नागरिकांना वाहनचालकांना दिलासा दिला आहे. या पुलाबरोबरच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सावळाराम म्हात्रे क्रीडा संकुलातील आणि रुक्मिणीबाई रुग्णालयातील ऑक्सिजन प्लांट, रुक्मिणीबाई व डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयातील अत्याधुनिक शस्त्रक्रियागृह, ग्रामीण भागातील आय प्रभागातील नागरी आरोग्य केंद्र, आंबिवलीमधील जैवविविधता उद्यान, तेजस्विनी बस आणि कल्याण-डोंबिवली शहर दर्शन बस, टिटवाळा अग्निशमन केंद्र या सारख्या आठ प्रकल्पाचे लोकापर्ण केले जाणार असून हा कार्यक्रम मंगळवारी दुपारी 1 वाजता पालिकेच्या डोंबिवलीमधील सावित्रीबाई फुले नाट्यगृहात होणार आहे.

# ठाण्यात कोरोनाचे 52 नवीन रुग्ण

**ठाणे:** शहरातील कोरोना रुग्णांची संख्या वाढत असतानाही वागळे आणि मुंब्रा प्रभाग समितीमध्ये एकाही नवीन रुग्णाची नोंद झाली नाही. आठ प्रभाग समित्यांमध्ये एक आकडी रुग्णसंख्या आहे. 52 नवीन रुग्णांची भर पडली आहे तर 49 रुग्णांची कोरोनातून मुक्तता झाली आहे. दोन रुग्ण दगावले आहेत.

महापालिका हद्दीतील कोरोना रुग्ण वाढत असताना सलग दोन दिवस वागळे येथे आणि आज मुंब्रामध्ये एकही रुग्ण आढळून आलेला नाही. तर सर्वात जास्त 21 नवीन रुग्ण माजिवडे-मानपाडा प्रभाग समितीमध्ये सापडले आहेत. आठ रुग्णांची वाढ उथळसर येथे झाली आहे. प्रत्येकी सात रुग्णांची भर वर्तकनगर आणि कळवा प्रभाग समिती परिसरात पडली आहे. नौपाडा-कोपरी प्रभाग समितीमध्ये चार, दिवा प्रभाग समिती येथे तीन आणि लोकमान्य-सावरकर प्रभाग समिती क्षेत्रात दोन रुग्ण नोंदवले गेले आहेत.

विविध रुग्णालयात आणि घरी उपचार घेत असलेल्या रुग्णांपैकी 49जण कोरोनामुक्त झाले आहेत. आत्तापर्यंत एक लाख 34 हजार 895जण ठणठणीत बरे होऊन घरी गेले आहेत तर रुग्णालयात आणि घरी 544 रुग्णांवर उपचार सुरु आहेत. दोन रुग्णांचा मृत्यू झाला असून आत्तापर्यंत दोन हजार 85जणांचा मृत्यू झाला आहे.

महापालिका प्रशासनाने काल शहरातील दोन हजार 247 नागरिकांची कोरोना चाचणी घेण्यात आली होती. त्यामध्ये 52जण बाधित सापडले आहेत. आत्तापर्यंत 19 लाख 22 हजार 530 ठाणेकरांची चाचणी घेण्यात आली असून त्यामध्ये एक लाख 37 हजार 524 नागरिक बाधित मिळाले आहेत.

पान १ वरुन

## कोकणात जाणाऱ्या गणेश भक्तांच्या वाहनांची टोलमुक्ती

कुडाळ मार्ग, आंबेनळी घाट, ताम्हिणी घाट, रत्नागिरी-सावर्डे रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची उर्वरित कामे दोन दिवसांत युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे निर्देशही मंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी दिले.

दरवर्षीप्रमाणे यंदाही कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांच्या वाहनांना पथकरात सवलत देण्याची घोषणा करतानाच या वाहनांसाठी स्टीकर्स तातडीने उपलब्ध करुन देण्याचे निर्देशही यावेळी श्री. शिंदे यांनी दिले. मुंबई-पुणे, पुणे-सातारा, मुंबई-गोवा या महामार्गावरील पथकर नाक्यांवर अधिकचे मनुष्यबळ नेमणूक करुन गणेश भक्तांच्या वाहनांसाठी स्वतंत्र मार्गिका ठेवल्यास वाहतूक कोंडी कमी होईल. सार्वजनिक बांधकाम विभाग, रस्ते विकास महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी समन्वयाने पथकर नाक्यांवर भाविकांची गैरसोय होणार नाही यासाठी विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

पथकर नाक्यांवर गणेश भक्तांशी वाद घालू नका, पथकर सवलतीचे स्टीकर्स उपलब्ध करुन देण्याबरोबर पथकर नाक्यांवर रुग्णवाहिका, जलद प्रतिसाद वाहने, जेसीबीबरोबरच पुरेसे पोलीस बंदोबस्तासाठी तैनात करा. कोविडचे संकट पाहता भाविकांना कोणताही त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचनाही श्री. शिंदे यांनी यावेळी दिल्या.

कोकणात जाणाऱ्या मार्गावर स्थानिक पोलीसांबरोबरच महामार्ग वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले असून भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये, वाहतूक खोळंबू नये यासाठी सर्व आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी सांगितले.

या बैठकीस ठाणे, रायगड, रत्नागिरी, पुणे, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, परिवहन, एसटी महामंडळ, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आदींचे वरिष्ठ अधिकारी तसेच पथकर कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी आपल्या कार्यक्षेत्रात केलेल्या कामांची आणि सुविधांची माहिती यावेळी दिली.

## इमारतीवर कारवाई न करण्यासाठी अधिकाऱ्यांनी लाखो रुपये उकळले ?

या गंभीर प्रकरणाची पालिका आयुक्तांनी दखल घेत या प्रकरणाची चौकशी करुन दोषींच्या विरोधात कारवाई केली जाईल असे स्पष्ट केले आहे.

डोंबिवली पूर्व भागातील दावडी परिसरात डीपी रस्त्यात येणाऱ्या सहा मजली बेकायदा इमारतीवर कल्याण-डोंबिवली महापालिकेने चार दिवसांपूर्वी कारवाई केली. या बेकायदेशीर सहा मजली इमारतीवर कारवाई टाळण्यासाठी या इमारतीचा बिल्डर मुना सिंग याने पालिकेचे उपायुक्त अनंत कदम व प्रभाग क्षेत्र अधिकारी दीपक शिंदे यांची एका हॉटेलमध्ये बैठक घेतली होती. यावेळी कारवाई न करण्यासाठी चर्चा करीत लाखों रुपये दिले होते. लाखों रुपये घेऊन सुद्धा पालिकेने या इमारतीवर कारवाई करीत जमीनदोस्त केल्याने बिल्डर मुन्ना सिंग याने उपायुक्त अनंत कदम व प्रभाग क्षेत्र अधिकारी दीपक शिंदे यांनी लाखो रुपये उकळल्याचा गंभीर आरोप करीत या पूर्वी ही अनेक वेळा या अधिकाऱ्यानं वारंवार पैसे दिले असून दोघानी आयुक्तांच्या नावावर सुद्धा पैसे घेतले असल्याचे बिल्डर मुन्ना सिंग यांनी संगितले.

विकासकाने ज्या हॉटेलमध्ये पैशाची देवाण घेवाण झाली त्यावेळेचे व त्या ठिकाणचा सीसीटीव्ही फुटेज प्रसिद्धी माध्यमांना देत या प्रकरणाचा चांगलाचा भांडाफोड केला आहे. या प्रकरणाने पालिकेत एकच खळबळ उडाली असून, अनधिकृत व बेकायदेशीर बांधकामाची पाळेमुळे किती पालिकेत खोलवर रुतलेली दिसून आले आहे. या भ्रष्टाचारात पालिकेच्या अधिकाऱ्यांसोबत शासनाने प्रतिनियुक्तीवर पाठवलेल्या उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांचे हात बरबटलेले असल्याने कुंपणच शेत खात असल्याने दोष द्यायचा कुणाला असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

या प्रकरणाची पालिका आयुक्त डॉ.विजय कुमार सूर्यवंशी यांनी गंभीर दखल घेतली असून या प्रकरणातील दोषींच्या विरोधात कारवाई केली जाईल अशी माहिती दिली आहे.

## बेळगाव महापालिकेवर कमळ फुललं, भाजपची एकहाती सत्ता

भाजपचे 2 खासदार, 2 आमदार आहेत. तर काँग्रेसचे दोन आमदार आहेत. सत्ता प्राप्त करण्यासाठी 33 या मॅजिक फिगरची गरज असते. भाजपनं 35 जागा जिंकत निर्विवादपणे सत्ता प्राप्त केली आहे.

**एकूण 385 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात**

गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित असलेल्या बेळगाव महानगरपालिका निवडणुकांसाठी 3 सप्टेंबर रोजी मतदान पार पडलं होतं. मराठी भाषिकांनी बेळगावचा गड राखण्याची तयारी सुरु केली होती, मात्र ते त्यात यशस्वी ठरले नाहीत. बेळगाव महानगरपालिका निवडणुकीसाठी एकूण 385 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. यात भाजप 55, काँग्रेस 45, महाराष्ट्र एकीकरण समिती 21, जेडीएस 11, आम आदमी 37, एआयएमआयएम 7, अन्य दोन आणि अपक्ष 217 उमेदवारांचा समावेश होता.

**अपवाद वगळता मतमोजणी शांततेत**

तुरळक अपवाद वगळता मतमोजणी शांततेत पार पडली. गर्दी केल्यानं एकदा पोलिसांची सौम्य लाठीचार्ज केला. मतमोजणी केंद्रात पाचशे पोलीस बंदोबस्तासाठी तैनात करण्यात आले होते. मतमोजणी केंद्राच्या परिसरात 144 कलम जारी करण्यात आले आहे. शहरात मतमोजणी दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून शहरात 1500 पोलीस बंदोबस्तासाठी नेमण्यात आले आहेत. मतमोजणी केंद्राकडे जाणारे सगळे रस्ते बॅरिकेड्स लावून बंद करण्यात आले आहेत.

बेळगाव महानगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रीय पक्ष प्रथमच पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवल्या गेल्या. भाजप आणि काँग्रेस पक्षानं सगळ्या प्रभागात आपले उमेदवार उभे केले होते. यात भाजपला 35 जागांवर तर काँग्रेसला 10 जागांवर विजय मिळाला. मात्र गेल्यावेळी सत्तेत असलेल्या महाराष्ट्र एकीकरण समितीला सपाटून पराभवाचा सामना करावा लागला.

## गॅस सिलेंडरचे दर नऊशे रुपयांवर

संपूर्ण शहरभर आदरणिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना धन्यवाद देणारे फलक आम्ही लावलेले आहेत. डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान होते. त्यावेळी 1 एप्रिल 2014 रोजी घरगुती गॅसचा भाव हा 410 रुपये होता आणि 1 सप्टेंबर 2021 रोजी त्याच सिलिंडरचा भाव हा 889.50 रुपये झाला आहे. सबका साथ, सबका विकास आणि आता सबका प्रयास म्हणणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे कधीच महागाईवर बोलत नाहीत; वाढलेल्या इंधन दरवाढीवर बोलत नाहीत; बेरोजगारीवर बोलत नाहीत. कोरोनाच्या काळात लसीकरणाचा जो घोळ झाला आहे. तो केंद्रामुळे झाला. त्याच्यावर बोलत नाहीत. मात्र. दरमहा गॅस सिलिंडरचा दर वाढत आहे. आता तर केंद्राने अशी प्रणाली तयार केली आहे की पेट्रोलियम कंपन्या दर महिन्याच्या एक तारखेला किमंत वाढवणार आहेत. शेवटची किमंत ही 17 ऑगस्टला झाली होती. आता पुन्हा 15 दिवसांनी घरगुती गॅसचे दर 25 रुपयांनी वाढविले आहेत. गणेशोत्सवाच्या प्रसंगी नागरिकांना त्यांच्याकडून ही भेटच आहे, अशी खोचक टीकाही त्यांनी केली.

## बाल शिवाजी उद्यानात कचऱ्याचा प्रकल्प; मनसेचा विरोध

सुंदर असे उद्यान विकसित करण्यात आलेले होते, मात्र या उद्यानात कचऱ्यापासून खत निर्मितीचा प्रकल्प सुरु करण्यात येत आहे. मनपातील सत्ताधारी शिवसेना -काँग्रेस-राष्ट्रवादी व मनपा प्रशासनाच्या संगनमताने हा प्रकल्प राबवीला जात आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक नागरिकांचे हक्काचे उद्यान नष्ट होणार आहे, असा आरोप मैनुदिन शेख यांनी केला आहे. या प्रकल्पाचे काम त्वरित थांबवावे अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा शेख यांनी दिला आहे.

या संदर्भात मनपाचे जनसंपर्क अधिकारी युवराज भदाणे यांना विचारले असता ते म्हणाले की हा एक छोटासा प्रकल्प असून मनपाच्या सार्वजनिक विभागाकडून बांधण्यात येत आहे, यामुळे कोणत्याही प्रकारची दुर्गंधी अथवा कचरा जमा होणार नाही तर कचरा नष्ट होऊन त्यापासून खत निर्मिती होणार आहे.



# ब्लॅकमेलर माहिती अधिकार कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करा

## अधिकाऱ्यांची आयुक्तांकडे मागणी

**भाईंदर :** माहिती अधिकार च्या नावाखाली शासकीय कामात अडथळा निर्माण करीत अधिकारी वर्गाला ब्लॅकमेल करणाऱ्या माहिती अधिकार कर्त्यांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांची पोलीस विभागामार्फत कसून चौकशी करण्यात यावी अशी मागणी मीरा-भाईंदर महानगरपालिकेतील वर्ग - 2 च्या अधिकाऱ्यांनी महापौर जोत्स्ना हसनाळे यांच्याकडे केली आहे.

मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात माहिती अधिकार कर्त्यांचा चांगलाच सुळसुळाट वाढला आहे. माहिती अधिकाराच्या नावाखाली यापैकी काही विशिष्ट माहिती अधिकार कर्त्यांकडून माहिती अधिकारात माहिती मागविणारी दिवसाला असंख्य पत्रे येत असतात त्यामुळे महानगरपालिकेतील अधिकारी तथा कर्मचारी वर्ग कमालीचा त्रस्त झालेला आहे. या महानगरपालिकेत काही पदांवर 1225 अधिकारी तथा कर्मचारी वर्ग कार्यरत आहेत. कार्यालयीन कामकाजात देखील मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. यातच माहिती अधिकारातील पत्रांवर 30 दिवसांच्या आत उत्तरे देणे बंधनकारक असल्याने माहिती न दिल्यास दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागत आहेत. त्यामुळे कार्यालयीन कामाचा निपटारा करने देखील अशक्य होऊन बसले आहे. माहिती अधिकार कर्त्यांच्या तक्रारीचे उत्तर वेळत न दिल्यास अधिकारी तथा कर्मचारी वर्गाला कारणे दाखवा नोटिसीचा देखील सामना करावा लागत आहे. माहिती अधिकार अधिनियमांचा गैर वापर करुन अनेकदा अधिकारी तथा कर्मचारी वर्गावर दबाव टाकला जात असतो. तसेच त्यांच्याकडून चुकीची कामे करुन घेण्याचा प्रयत्न देखील केला जात असतो. इतकेच नव्हे तर अनेकदा या अधिकारी तथा कर्मचारी वर्गाकडून आर्थिक मागणीदेखील केली जात असल्याचा आरोप या अधिकारी वर्गाने आपल्या निवेदनात केला आहे.

सदर निवेदनाची प्रत महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती, महापालिका आयुक्त तसेच पोलीस आयुक्त यांना देण्यात आलेली आहे. या निवेदनावर चंद्रकांत बोरसे, अविनाश जाधव, सुदाम गोडसे, सुनील यादव, संजय दोंदे, नरेंद्र चव्हाण, मंजीरी डिमेलो, चारुशिला तरपडे, दिपाली जोशी, नितीन मुकणे, किरण राठौड, यतीन जाधव, जगदीश भोपतराव, दामोदर संख्ये, राजकुमार घरत, दिपक खांबित आणि दिलीप जगदाळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# महिन्याभरात मलेरियाचे ७६ रुग्ण; धूर-औषध फवारणी सुरू

**ठाणे:** ऑगस्ट महिन्यात शहरात मलेरियाचे 76 रुग्ण आढळून आले तर 27 संशयित डेंग्यू रुग्णांपैकी एका रुग्णाचे निदान झाले आहे. शहरामध्ये साथीचे आजार उद्भवू नयेत यासाठी महापालिका आयुक्त डॉ. विपीन शर्मा यांच्या आदेशानुसार धूर व औषध फवारणी सुरु आहे. पाण्यामुळे साथीचे आजार पसरू नये यासाठी प्रत्यक्ष घरी जावून पाण्याची तपासणी करण्यात येत आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये माहे ऑगस्ट 2021 मध्ये डेंग्युचे संशयित रुग्णसंख्या 27 आणि निश्चित निदान केलेली एक रुग्णसंख्या आहे. तसेच मलेरियाचे माहे ऑगस्ट 2021 मध्ये फक्त 76 रुग्ण आढळून आले होते. आरोग्य विभागाच्यावतीने शहरात गृहभेटी देवून तपासणी करण्यात येत असून एकुण 51,561 घरांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी 1,496 घरे दूषित आढळून आली. एकुण 76,912 कंटेनरची तपासणी केली असता त्यापैकी 1,567 कंटेनर दूषित आढळून आले. या 497 दूषित कंटेनरमध्ये अळीनाशक टाकण्यात आले. तर 988 दूषित कंटेनर रिकामे करून काही कंटेनरमध्ये गप्पी मासे सोडण्यात आले.

दरम्यान महापालिका कार्यक्षेत्रात 90 हॅण्डपंप, 10 ट्रॅक्टर्स, सहा ई-रिक्षा, आठ बोलेरो वाहनांमार्फत दोन सत्रात 1,766 ठिकाणी औषध फवारणी आणि 40 धूर फवारणी हॅण्डमशीनव्दारे 10,294 ठिकाणी धूर फवारणी करण्यात आली आहे.

# गणेश मंडळांना लसीकरण केंद्र सुरु करु द्या

## युवासेनेचे अनमोल म्हात्रे यांनी केली थेट मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**कल्याण :** प्रभागा-प्रभागात गणेश मंडळाचे काम असते. त्यामुळे गणेश उत्सव मंडळांना लसीकरण केंद्र सुरु करण्याची परवानगी द्या, जेणेकरुन नागरिकांचे लसीकरण होईल, अशी मागणी शिवसेना युवासेनेचे अनमोल म्हात्रे यांनी थेट मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व राज्याच्या आरोग्य विभागास केली आहे.

यंदा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने निर्बंधही शिथिल झाले आहेत. साधेपणाने उत्सव साजरा करण्याची परवानगी राज्य शासनाने देऊ केली आहे. सध्या नागरिकांचे लसीकरण पूर्ण होण्याची गरज आहे. त्यातच कोरोना प्रतिबंधक लसींचा अपुरा पुरवठा यामुळे आजही अनेक नागरिक लसीच्या पहिल्या डोसपासून वंचित आहेत.

गणेशोत्सवादरम्यान प्रत्येक मंडळास लसीकरण केंद्र सुरु करण्याची परवानगी दिल्यास प्रभागातील नागरिकांनाही सोयीचे होऊन जास्तीत जास्त नागरिकांचे लसीकरण पूर्ण होईल. लसीकरणाचा वेग वाढवून आरोग्य सेवकांचा भारही कमी होईल. त्यासाठी लागणारा लस साठाही महापालिका प्रशासनास उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे डोंबिवली पश्चिमेचे युवासेना उपशहर अधिकारी अनमोल म्हात्रे यांनी केली आहे.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, हरी ओम सो. नोंदणी क्र. टीएनए/केएलएन/एचएसजी/ टीसी/१०८७२/९९-२०००, गडकरी पथ, सी. के. पी. हॉलजवळ, डोंबिवली (पुर्व), ता. कल्याण, जि. ठाणे यांनी त्यांच्या प्लॉट नं. ३०. सर्वे न.३७९ ए., सि.टी.एस नं. ६९५८ ते ६९६१. क्षेत्रफळ ८०२.७० चौ मिटर, मिडलक्लास गव्हर्नमेन्ट सर्व्हन्टस सो. लि.. या सोसायटीचे प्लॉट धारक श्री. पंढरीनाथ व्दारकानाथ वढावकराच्या नावाचे क्र ३८८ या एक भाग व क्र. १२१ ते १२५ चे पाच भाग, असे ६ शेअर्स असलेले शेअर्स सर्टीफिकेटस् गहाळ झाल्याने व शोध घेउन देखील न मिळाल्याने ड्युप्लीकेट शेअर्स सर्टीफिकेट मिळण्यासाठी व वर नमुद शेअर्स हरी ओम सोसायटीचे नावे करणेसाठी आमचेकडे अर्ज केलेला आहे. तरी वर नमुद केलेले मुळ शेअर्स सर्टीफिकेटस् कोणाला आढळल्यास किंवा सदर मुळ शेअर्स सर्टीफिकेटस्च्या आधारे कोणाचा कोणत्याही प्रकारचा बोजा, कर्ज, लेखी करार लीज, वारसा, भाडेपट्टा तारण, जामिन, ताबा, विक्री, भेट, लीन, गहाण, देखभाल, इजमेंट, हस्तांतर, परवाना, दावा, हक्क, हितसंबंध असल्यास खाली सही करणार याचे कार्यालयात नोटीस जाहीरातीपासुन १५ दिवसांच्या लेखी देण्यात यावी. अन्यथा डयुप्लीकेट शेअर्स सर्टीफिकेट हरी ओम सोसायटीला शेअर्स त्याचे नावे करून दिले जातील त्यानंतर आलेले क्लेम विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**पत्ता** : सुधा कुंज, पहिला माळा, ब्राम्हण सभेसमोर, टिळक रोड, डोंबिवली (पू.), ता. कल्याण, जि. ठाणे-४२१ २०१. मो. ९८३३२९३९५९

सही/-
**एन. एस. पिळणकर**
(वकील व नोटरी)

**जाहीर नोटीस**

सर्व संबंधितांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, माझे पक्षकार **श्रीमती सुरैया अब्दुल कादर पटेल आणि इतर ०५** सर्व राहणारः ए३/५०३, हॅपी व्हॅली. फेज-१, टिकूजीनीवाडी जवळ, मानपाडा, ठाणे-४००६०७ यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेली निवासी सदनिका इच्छुक खरेदीदार १) श्री.रमेश चंद्र बन्सीलाल सोफ्ता, आणि २) सौ. सिमपी अक्षय सोफता, विक्री करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकत ही मूळ. श्री.अब्दुल कादर पटेल यांचे एकमेव मालकीची होती ज्यांचे निधन दिनांक ३०/०४/२०१७ रोजी झाले असून त्यांचे पश्चात माझे पक्षकार म्हणजेच १) पत्नी - श्रीमती सुरैया अब्दुल कादर पटेल, २) मुलगी मेहेर अब्दुल कादर पटेल, ३) मुलगी झकीरा अब्दुल कादर पटेल, ४) मुलगा-जवाद अब्दुल कादर पटेल, ५) मुलगा - फहाद अब्दुल कादर पटेल, ६) मुलगी - नबीला अब्दुल कादर पटेल, असे एकूण ६ त्यांचे कायदेशीर वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त सदर मिळकतीमध्ये इतर कोण्या व्यक्ती / व्यक्तींचे, वारसांचे हक्क, हितसंबंध, दान, लिज, पोटगी, साठेकरार, खरेदीखत, मेंटेनन्स, वगैरे अनुषंगाने कसलाही हितसंबंध असल्यास अथवा सदर सदनिकेचे विक्री व्यवहारास काही हरकत असल्यास तशी लेखी हरकत कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्या कडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत सादर करावी या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या कसल्याही हरकती आल्या नाही तर सदरहू सदनिका ही निर्वेध बोजेविरहित आहे असे समजून माझे पक्षकार सदर सदनिकेचा विक्री व्यवहार इच्छुक खरेदीदारासोबत पूर्ण करतील त्यानंतर कोणाच्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ट**

तुकडी व पोटतुकडी ठाणे, तालुका व जिल्हा ठाणे, ठाणे महानगरपालिकेचे हद्दीतील, मे. दुय्यम निबंधक सो, ठाणे यांचे स्थळसिमेतील मौजे कावेसर, घोडबंदर रोड, ठाणे (प) सर्व्हे नं. १६३/५(पै), ६ (पै), ७ (पै), ८ (पै), ९ (पै), स. नं. १६५/१(पै), २(पै) स. नं. १६६/६ (पै), ७ (पै), ८ (पै), ९, १०(पै), ११ (पै), १२ (पै), १३ (पै), १४ (पै), १५ (पै), १६ (पै), २२(पै), २४(पै), व ३० (पै) आणि स. नं.१६७ या मिळकतीवर स्थित असलेल्या पार्कवूडस या संकुलातील पार्कवूडस बी१ को. ऑ. हौ. सो. लि., या सोसायटीचे विंग नं बी-१. या इमारतीचे १२ व्या मजल्यावरील निवासी सदनिका म्हणजेच - फ्लॅट नं. १२०३ जिचे एकुण क्षेत्र ५७.९९ चौ. मिटर कारपेट असे आहे अशी निवासी सदनिका.

**दिनांक** : ०७/०९/२०२१

**पत्ता**-ऑफीस नं.३०१, तिसरा मजला राजन निवास, आवाज रेडियो समोर, एदलजी रोड, चरई, ठाणे-४००६०१

सही/-
**ॲड. मयूर र. कदम**

'ठाणेवैभव' हे दैनिक मालक-मुद्रक-प्रकाशक मिलिन्द बल्लाळ यांनी मिड-डे इन्फोमिडिया लि., R/847/3, टी.टी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी रबाळे, नवी मुंबई-४००७०१. महाराष्ट्र येथे छापून दामले अपार्टमेंट, टेंभीनाका, ठाणे (प) महाराष्ट्र -४००६०१ येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी नं. २५३४१५२६,२५३४८५९४ Email : thanevaibhav1975@gmail.com

# “गर्दी करणारे राजकीय, धार्मिक कार्यक्रम टाळा”

## मुख्यमंत्र्यांची पक्ष-संघटनांना कळकळीची विनंती

**मुंबई : गेल्या काही दिवसात राज्यात पुन्हा एकदा करोना रुग्णांच्या संख्येत किंचित वाढ झाल्याचं दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील पक्ष आणि संघटनांना कळकळीची विनंती केली आहे. “मागील लाटेचा अनुभव लक्षात घेता, मी सर्व राजकीय पक्ष आणि संघटनांना विनंती करतो की, त्यांनी गर्दी होणारे राजकीय कार्यक्रम, सभा, मोर्चे त्वरित स्थगित करावेत. इतर कार्यक्रम काटेकोरपणे नियमांत राहून साजरे करु शकता. मात्र आता आपल्याला मुळात तिसरी लाट येऊच द्यायची नाही, जनतेच्या आरोग्याला प्रथम प्राधान्य द्या.”, असं आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पुन्हा एकदा केले आहे.**

“राज्याचा मुख्यमंत्री म्हणून सरकारला या संकटाशी सामना करण्यासाठी संपूर्ण तयारीत राहण्याच्या स्पष्ट सूचना आहेतच, पण सत्ताधारी, विरोधी अशा सर्वच पक्षांना मी आवाहन करीत आहे की, आता अधिक काळजी घ्या. गर्दीचे कार्यक्रम टाळा. सण, उत्सव आले आहेत, त्यावर निर्बंध लावावेत असे कोणाला वाटेल? पण शेवटी आपले आरोग्य, प्राण महत्त्वाचे. उत्सव नंतरही साजरे करु.तर पुन्हा कडक निर्बंध लावण्याची वेळ येणार नाही.”, असंही त्यांनी पुढे सांगितलं. “हे उघडा ते उघडा’ या मागण्या ठीक आहेत, पण त्यातून धोका वाढला आहे. प्रत्येकाने नियम आणि मर्यादा पाळल्या तर पुन्हा कडक निर्बंध लावण्याची वेळ येणार नाही. म्हणूनच माझ्या शिवसेनेसह सर्वच राजकीय पक्षांना मी विनम्र आवाहन करीत आहे, आपण सगळ्यांनीच शहाणपणाने वागून लोकांच्या जिवाचे रक्षण करायला हवे. सण, उत्सव आज झाले नाहीत तर उद्या नक्की येतील, पण घरातला प्रत्येक माणूस आपल्यासाठी महत्त्वाचा आहे. लोकांच्या जिवावरील विघ्न टाळायचे असेल तर, शासनाने वेळोवेळी आखून दिलेल्या आरोग्याच्या नियमांचे पालन होईल हे काटेकोरपणे पहा, गर्दी करु नका. सार्वजनिक कार्यक्रम टाळा. राजकीय सभा, संमेलनांना उत्तेजन देऊ नका, हीच त्या विघ्नहर्त्या श्री गणेशाची इच्छा असेल.”, असंही त्यांनी पुढे सांगितलं.

“मला वारंवार आपणांस हे आवाहन एवढ्याचसाठी करावे लागते आहे, कारण करोना परत वाढतोय. येणारे दिवस आव्हानात्मक असतील आणि परिस्थिती हाताबाहेर जाऊ द्यायची नसेल तर विशेषतः सर्व राजकीय पक्षांवर त्याची प्रमुख जबाबदारी आहे.

दुसऱ्या लाटेची सुरुवात कशी झाली त्याची आपणास पूर्ण कल्पना आहे. या लाटेत ऑक्सिजनचा मोठा तुटवडा होऊन बिकट परिस्थिती निर्माण झाली होती. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर देशाला देखील यातून जावे लागले होते.” असंही त्यांनी सांगितलं.

“करोनाने जोरदार धडक द्यायला सुरुवात केलीय. अमेरिकेत तिसऱ्या लाटे जीवन अत्यावस्त केले. चीनही विळख्यात सापडलाय. आपल्या देशातच केरळ राज्यात रोज 30 हजार नवे रुग्ण समोर येत आहेत. हा धोक्याचा इशारा आहे व तो आपण सगळ्यांनी गांभीर्याने घेतला नाही, तर महाराष्ट्राला जनजीवनाची फार मोठी किंमत चुकवावी लागेल.”, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिला आहे.

# चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेची पतीकडून हत्या; १३ दिवसानंतर हत्येचा उलगडा

**उल्हासनगर: चारित्र्याच्या संशयावरून एका 25 वर्षीय महिलेची तिच्या पतीने हत्या करून ओळख पटू नये म्हणून तिचा चेहरा जाळला होता. या हत्येनंतर आरोपी फरार झाला होता. तब्बल 13 दिवसानंतर उल्हासनगर गुन्हे शाखा पोलिसांनी या गुन्ह्याचा यशस्वीपणे तपास करून आरोपीला अटक केली आहे.**

अंबरनाथच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत, उल्हासनगर- 5 येथील गायकवाडपाडा परिसरात भागूबाई चिकनकर चाळमध्ये हा हत्येचा प्रकार घडला होता.

चिकनकर चाळीत असलेल्या एका बंद खोलीतून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत असल्याचे स्थानिक नागरिकांच्या लक्षात आले. याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाण्याला माहिती देण्यात आली होती.

22 ऑगस्ट 2021 रोजी सायंकाळी 5.30 वाजताच्या सुमारास पोलिसांनी खोलीचा दरवाजा तोडून आत प्रवेश केला असता 25 वर्षीय महिलेचे अर्धवट जाळलेले व कुजलेले प्रेत आढळून आले होते.



पोलिसांनी पंचनामा करुन मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी पाठवला होता. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती.

शिवाजीनगर पोलिसांसोबतच उल्हासनगर गुन्हे शाखा, घटक -4 चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तरडे, पोलीस निरीक्षक मनोहर पाटील, पोलीस अधिकारी संपत फडोळ, किशोर महाशब्दे, सुरेंद्र पवार, श्याम रसाळ, संजय माळी, पोलीस कर्मचारी महेश पाटील, विकास कर्णे, विश्वास माने या पथकाने तपास सुरु केला होता.

या गुन्ह्याचे कोणतेही धागेदोरे पोलिसांकडे नसतांना सर्वप्रथम त्यांनी मृत महिलेची गुप्त महितीदारांमार्फत माहिती मिळवली असता तिचे नाव सुशीला निकाळजे उर्फ काजल (25) असल्याचे निष्पन्न झाले.

सुशीला उर्फ काजलचे आरोपी सुरज खरात (26) याच्याशी काही दिवसांपूर्वीच लग्न झाले होते. लग्नानंतर सुरजने गायकवाडपाडा येथील भागूबाई चिकनकर चाळीत एका खोली भाड्याने घेतली व तेथे हे पती-पत्नी राहू लागले होते. सुरज हा सुशीलावर चारित्र्याचा संशय घेऊन मारहाण करीत असे. रागाच्या भरात त्याने तिच्या लेसने सुशीलाच्या गळ्याभोवती आवळून तिची हत्या केली आणि ओळख पटू नये म्हणून तिचा चेहरा जाळून टाकला. यानंतर सुरजने घराच्या दरवाज्याला कुलूप लावून तो पळून गेला.

गुन्हे शाखेच्या पोलिसांना सुरज हा बदलापूर (पूर्व) येथील कामगार नाक्यावर काल सकाळी येणार असल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून सुरजला अटक केली आहे.

# सत्यशोधक कामगार संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी संजय भालेराव




**शहापूर: असंघटित कष्टकरी कामगारांच्या न्याय, हक्क व प्रतिष्ठेसाठी लढणाऱ्या सत्यशोधक कामगार संघटनेच्या शहापूर तालुका अध्यक्षपदी संजय भालेराव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.**

बांधकाम व्यवसायासाठी लागणारा कामगार तसेच शहरातील चौका चौकात कामाच्या प्रतिक्षेत उभा राहणारा नाका कामगार, घर कामगार आणि शेतमजूर अशा सर्व क्षेत्रातील 142 असंघटित कामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यामुळे त्यांच्या समस्याही वाढल्या आहेत. संघटनेच्या वतीने आतापर्यंत कष्टकरी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे व समस्या सोडवण्यासाठी सनदशीर मार्गाने आंदोलने केली जात आहेत.

या संघटनेच्या वाढीसाठी व कामगारांच्या संपर्कात राहून त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी सत्यशोधक कामगार संघटनेच्या शहापूर तालुका अध्यक्षपदी संजय भालेराव यांची नियुक्ती संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सागर तायडे यांनी केली आहे. या नियुक्तीबद्दल संजय भालेराव यांचे सर्वथरातून अभिनंदन केले जात आहे.

# पात्र लोकांना लसीचा पहिला डोस देणारं हिमाचल प्रदेश हे पहिलं राज्य - पंतप्रधान



**नवी दिल्ली : देशात राष्ट्रीय लसीकरण मोहिमेअंतर्गत भारतात दररोज 1.25 कोटी लशी राज्यांना पुरवल्या जात आहेत. लशींची संख्या ही अनेक देशांच्या लोकसंख्येपेक्षा जास्त आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवारी म्हणाले. तसेच हिमाचल प्रदेश हे सर्व पात्र लोकांना करोना लसीचा पहिला डोस देणारे पहिले राज्य बनले आहे. सिक्कीम, दादरा आणि नगर हवेलीने देखील हे लक्ष्य पूर्ण केलंय, असेही त्यांनी सांगितले.**

यावेळी पंतप्रधाने मोदींनी राज्यातील आरोग्य कर्मचारी आणि राज्यातील करोना लसीकरण कार्यक्रमाच्या लाभार्थ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. पायाला फ्रॅक्चर असूनही लोकांचे लसीकरण केल्याबद्दल पंतप्रधान मोदींनी उना येथील आरोग्य कर्मचारी कर्मो देवी यांचे कौतुक केले. देवी यांनी आतापर्यंत 22 हजार 500 लोकांचं लसीकरण केलंय. दरम्यान, लाहौल-स्पीती येथील नवांग उपशाक यांनी मोदींना सांगितले की, अटल बोगद्याने आदिवासी जिल्ह्यातील पर्यटन क्षेत्राला चालना दिली आहे.

“मी हिमाचल प्रदेशला मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करताना पाहिले आहे. पण आज ते खूप चांगलं काम करत आहेत. सरकार आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे अभिनंदन. डोंगराळ राज्य असल्याने हिमाचलला वाहतूक आणि साठवणुकीमध्ये अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागले. परंतु राज्य सरकारने हे काम प्रशंसनीय पद्धतीने हाताळले,” असे म्हणत त्यांनी हिमाचल प्रदेश सरकार आणि मुख्यमंत्री जयराम ठाकूर यांचे कौतुक केले.

---

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग,
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेमार्फत कळवा प्रभाग समिती मध्ये "प्रभाग सुधारणा निधी" या अंतर्गत प्र.क्र. २५ अ/क/ड मध्ये स्थापत्य कामे करणे, काँक्रीटीकरण करणे, शौचालय दुरुस्ती करणे अशा सात कामासाठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. सविस्तर निविदा सूचना व निविदा प्रपत्र संकेत स्थळ https:/mahatendrs.gov.in वर दि. ७/९/२०२१ ते दि. २१/९/२०२१ पर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई टेंडरींग पध्दतीने दि.२१/९/२०२१ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि.२३/९/२०२१ रोजी १६.३० वाजता उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारणे न दाखविता नाकारणेचा अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-कळवा/५०७/२१-२२ **सही/-**
दि:०६.०९.२०२१ कार्यकारी अभियंता
*pls visit our official web-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

---

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

संगणक विभाग
निविदा सुचना

कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्याच्या दृष्टीने वॉर रूम सक्षमीकरण अंतर्गत Interactive Voice Response (IVR) यंत्रणा ६ महिन्याकरीता कार्यान्वीत करणेकामी ऑन लाईन निविदा अनुभवी व रजिष्टर ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. सदरच्या निविदा दि.०७.०९.२०२१ ते दि.१४.०९.२०२१ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा दि.१४.०९.२०२१ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत या संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील. सर्व निविदाकारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या निविदा योग्य त्या वेळे अगोदर ऑनलाईन सुपूर्द करावेत, जेणेकरून अगदी शेवटच्या वेळेला सिस्टममध्ये तांत्रिक बिघाड झाल्यास निविदा सुपूर्द करणेस अडचण निर्माण होऊ नये याची दक्षता घ्यावी आणि अशा वेळेस कोणत्याही कारणास्तव निविदेस मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. वरील नमूद संकेतस्थळावरील निविदा प्रपत्रामधील निविदा अटी व शर्ती वाचून मान्य असतील अशा निविदाकारांनी निविदा दाखल कराव्यात व दि.१५.०९.२१ रोजी सायं.५.०० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/संगणक/५१०/२१-२२ **सही/-**
दि:०६.०९.२०२१ मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी
*pls visit our official web-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

---

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that M/s. AAKASH DEVELOPERS, (PAN NO.AALFA1452F), a Partnership Firm duly registered under the provisions of Indian Partnership Act, 1932, having its registered office at 2nd floor, Rosa Vista, Opp. Suraj Water Park, Ghodbunder Road, Thane (West) -400615 have represented to my clients that (a) by diverse registered Agreements, they have acquired development rights in respect of various properties more particularly described in the First Schedule hereunder written and (b) by virtue of registered Sale/Conveyance Deed, they have acquired the ownership rights in respect of property more particularly described in the Second Schedule hereunder written (hereinafter collectively referred to as “Said Property”). The said M/s. Aakash Developers have agreed to sell the said Property to my client and further I have been instructed by my client to investigate the title as well as development rights of the said M/s. Aakash Developers to the said Property.

Any person or persons having any claim, demand or share in respect of the said property or any part thereon either by way of sale, lease, sub-lease, tenancy, leave and license, development right, mortgage, charge, lien, gift, exchange, release, trust, maintenance, bequest, inheritance, possession, occupation, Memorandum of Understanding, arrangement, easement, beneficial interest or otherwise howsoever, are hereby requested to make the same known in writing to the undersigned at his office at A-501, Raunak Tower, Opp. Saraswat Bank, B.P.D. Lane, Naupada, Thane 400 602 within a period of 14 days from the date of publication of this notice together with supporting documents duly notarized as true copy, failing which, claims and/or demand if any, shall be deemed to have been waived and/or abandoned.

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO**

ALL THOSE pieces and parcels of land bearing the Survey No.121 Hissa No.6 admeasuring 450 sq. mtrs., Survey No.121 Hissa No.7 admeasuring 450 sq. mtrs., Survey No.120 Hissa No.13 admeasuring 1,530 sq. mtrs., Survey No.120 Hissa No.7/3 admeasuring 430 sq. mtrs., Survey No.121 Hissa No.4 admeasuring 1,780 sq. mtrs., Survey No.121 Hissa No.5 admeasuring 430 sq. mtrs., Survey No.121 Hissa No.8 admeasuring 546.38 sq. mtrs., Survey No.121 Hissa No.9 admeasuring 1.370 sq. mtrs., Survey No.122 Hissa No.8 admeasuring 5,700 sq. mtrs. situate, lying and being at village Kolshet, Taluka & District Thane, Registration and Sub- Registration District Thane and within the local limits of the Thane Municipal Corporation.

**THE SECOND SCHEDULE ABOVE REFERRED TO**

ALL THOSE pieces and parcels of land bearing Survey No.121 Hissa No.3 admeasuring 1,060 sq. mtrs., Survey No.140 Hissa No.8 admeasuring 2,070 sq. mtrs. and Survey No.122 Hissa No.7 admeasuring 4,100 sq. mtrs., situate, lying and being at village Kolshet, Taluka & District Thane, Registration and Sub-Registration District Thane and within the local limits of the Thane Municipal Corporation.

Dated this 07th day of September, 2021.

**Sd/-**
**VISHWAS M. KULKARNI**
**Advocate**

---

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग,
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिकेमार्फत कळवा प्रभाग समिती मध्ये "नगरसेवक निधी" या अंतर्गत प्र.क्र. २५ अ,क,ड मध्ये स्थापत्य कामे करणे, बेंचेस पुरविणे, चेंबर कर्व्हर बसविणे, शेड बांधणे अशा दहा कामासाठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहे. सविस्तर निविदा सूचना व प्रपत्र संकेत स्थळ https:/mahatendrs.gov.in वर दि.०७/९/२०२१ ते दि.१४/९/२०२१ पर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई टेंडरींग पध्दतीने दि.१४/९/२०२१ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि.१६/९/२०१ रोजी १६.३० वाजता उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारणे न दाखविता नाकारणेचा अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-कळवा/५०८/२१-२२ **सही/-**
दि:०६.०९.२०२१ कार्यकारी अभियंता
*pls visit our official web-site* ठाणे महानगरपालिका,ठाणे
*www.thanecity.gov.in*

**संरक्षित रहा, कोरोना विषाणूंपासून सुरक्षित रहा !**

---

**नवी मुंबई महानगरपालिका**

**परिमंडळ-2 विभाग**

**निविदा सु.क्र.नमुंमपा/परि-2 जनरल निधी /का.अ.(घण.)/67/2020-21**

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | घणसोली विभागातील भुखंड क्र.31 से.-6 येथील मैदान व भुखंड क्र.13 से.-7 येथील मैदान या 2 ठिकाणी कृत्रिम तलाव सुधारणा करुन बसविणे. | 1,17,453/- |
| 2 | घणसोली विभागातील रबाळे व खदान तलाव (राजीव गांधी तलाव) या नैसर्गिक तलावांच्या ठिकाणी बॅरीगेटींग करणे. स्टोनडस्ट पसरविणे व किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | 1,99,428/- |
| 3 | घणसोली विभागातील MIDC व गावठाण परिसरातील कृत्रिम तलावांच्या ठिकाणी बॅरीगेटींग करणे व स्टोनडस्ट पसरविणे. | 2,41,984/- |
| 4 | घणसोली विभागातील कर्जु आई मंदिर तळवली येथील मोकळी जागा, से.-21 चे मैदान घणसोली, शेतकरी शिक्षण संस्थेचे मैदान घणसोली या 3 ठिकाणी कृत्रिम तलाव सुधारणा करुन बसविणे. | 1,76,054/- |
| 5 | घणसोली विभागातील भुखंड क्र.06 से.9 येथील मैदान,भुं.क्र.24 से.-3 सेंट्रल पार्कच्या शेजारी, पोलिस स्टेशन से.-4 शेजारील मोकळा भुखंड या 3 ठिकाणी कृत्रिम तलाव सुधारणा करुन बसविणे. | 1,73,054 |
| 6 | घणसोली विभागातील शिवाजी तलाव (घणसोली गांव) व गुणाली तलाव या नैसर्गिक तलावांच्या ठिकाणी बॅरेगेटींग करणे, स्टोनडस्ट पसरविणे व किरकोळ दुरुस्तीची कामे करणे. | 1,78,036/- |
| 7 | घणसोली विभागातील नोडल परिसरातील कृत्रिम तलावांच्या ठिकाणी बॅरेगेटींग करणे व स्टोनडस्ट पसरविणे. | 2,34,320/- |

**निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्याhttps://organizations.maharashtra.nextprocure.inया संकेत स्थळावर व नमुंमपाच्याwww.nmmc.gov.inया संकेत स्थळावर दिनांक 07/09/2021 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरणhttps://organizations.maharashtra.nextprocure.inया संकेत स्थळावर Online करण्याचे आहे. ई- निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेत स्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.** सही/-

**कार्यकारी अभियंता (घणसोली)**
**जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/736/2021 नवी मुंबई महानगरपालिका**

---

**जाहीर नोटीस**

ॲड.नागेश बडगंची

**भिवंडी येथील मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे कोर्टात**

इ.चौ.अर्ज.नं.६२०/२०२१

Timir Premchand Shah,
At. Laxmi Niwas R.No.02 Opp. Vinayak Mandir Kombad Pada Bhiwandi ...अर्जदार

विरुध्द

B.N.C.M.C. Bhiwandi ....सामनेवाले

ज्याअर्थी अर्जदार यांचे Mother कै. Shantaben Premchand shah यांचा दि.२८/०६/२०१७ रोजी यांचे राहते घरी R.No.2 Vinayak Mandir Kombadpada ता. भिवंडी, जि. ठाणे येथे मृत्यु झाले असुन, अर्जदार यांनी निर्धारीत कालावधीत त्यांच्या मृत्युची नोंद संबंधीत दप्तरी न केल्यामुळे तसा मृत्युचा दाखला संबंधीत विभागाकडून प्राप्त झाला नाही त्याकामी अर्जदार यांनी मे. कोर्टात जन्म मृत्यु नोंद अधिनियम २००० प्रमाणे यांच्या मृत्युचा दाखला मिळण्याकामी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब, सदरहु नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील प्रमाणे केलेल्या अर्जासंबंधी कोणाचे काही हितसंबंध, हरकत इ. असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत पुराव्यासहीत मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणुन द्यावे. याबाबत कोणाचीही हरकत दाखल झाली नसल्यास अर्जदाराच्या विनंती प्रमाणे उक्त अर्ज निकाली काढून तसा आदेश अर्जदाराच्या लाभात करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ही नोटीस आज दि.६/९/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

सही/–
(लिपिक)

कोर्टाचा शिक्का

हुकुमावरुन
सहाय्यक अधिक्षक,
सह दिवाणी न्यायालय, भिवंडी

---

**दिपक ज्योती महिला सहकारी पतपेढी मर्यादित, ठाणे**

नोंदणी क्र. टीएनए/टीएनए/आरएसआर(सीआर)
५८७/९१–९२, स्थापना दि.९–१२–१९९१
पारिजात, सेंट जॉन हायस्कूल समोर, वीर सावरकर पथ, चरई, ठाणे ४००६०१ फोन नं. २५३४८०६७

दि.७/०९/२०२१

**नोटीस वार्षिक सर्वसाधारण सभा**
**सूचना**

या सूचनेद्वारे सर्व सभासदांना कळविण्यात येते की, परपेढीची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक २२/९/२०२१ रोजी पारिजात, सेंट, जॉन हायस्कूलसमोर, वीर सावरकर पथ, चरई ठाणे (पश्चिम) येथे दुपारी वाजता भरेल. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सही/–**
**सौ. हेमांगी गजानन जोशी**
**कार्यवाह**

---

**PUBLIC NOTICE**
**IN THE COURT OF THE CIVIL JUDGE S. D. AT THANE**
MISCELLANEOUS APPLICATION NO. 961 OF 2021

1. Mrs. Suruchi Santosh Kasture ... Applicant
Age 54 yrs. Occupation Household
Residing at:- 1902, Solitaire C Wadhwa Elite, Behind Everest World, Kolshet, Thane 400607.
kasturemedha7@gmail.com, Mob: 9773686848

**Vs.**

1. Mr. Soham Santosh Kasture
Age 24 yrs. Occupation Service
Currently Residing at:-505 Park Street, Apartment no. 16, Minot-ND 58701. ...Non Applicant

Whereas Mrs. Suruchi Santosh Kasture, the Applicant herein has filed the above Miscellaneous Application No. 961 of 2021 for grant of Succession Certificate under Indian Succession Act,1925 before the Court of 47-Joint Civil Judge, Senior Division, Shri S. S. Indalkar Saheb, District Court, Thane, with respect to materialising transfer of DEMAT Account having DP Account No.38803797 (DEMAT Account) with HDFC Bank Ltd. Sharad Kunj, Dr. Moose Road, Opp. Gadkari Rangayatan, Talao Pali, Thane-400 602 in the name of her deceased husband Mr. Santosh Gajanan Kasture (the Deceased) as a sole DEMAT Account holder and valuing appx. Rs.16,99,180/44 (Rs. Sixteen Lakhs Ninety nine Thousand Paise Forty Four Only) as per current price quoted on National Stock Exchange (NSE). The Deceased who was last residing at 1902, Solitaire C Wadhwa Elite, Behind Everest World, Kolshet, Thane 400607, expired on 3rd May 2021. The Applicant Mrs. Suruchi Santosh Kasture is the wife of the Deceased.

Whereas the abovenamed Applicant has filed Miscellaneous Application for grant of Succession Certificate under Indian Succession Act, 1925 before the Court of the 47- Joint Civil Judge, Senior Division, Shri S. S. Indalkar Saheb, District Court, Thane,

You, the public at large, are hereby given notice that if any person or party has any objection for the grant of the Succession Certificate in favour of the Applicant then such person or party may appear in the Court of 47- Joint Civil Judge S. D. Thane (Shri S. S. Indalkar Saheb), in person or represented by pleader and file say/objections, if any, within 30 (thirty) days from the date of publication, failing which the said application will be held presuming that there is no objection from any person whatsoever and the application will be finally decided.

Given under my hand and seal on this 4th day of September 2021.

**Sd/-**
**By Order**
**Asst. Superintendent.**
**Civil Court, (S.D.) Thane.**

---

**जाहीर नोटीस**

याद्वारे तमाम जनतेस असे सुचित करण्यात येते आहे की, मी श्रीमती शांतीबा रतनसिंह जाडेजा, राहणार - अे-०४, न्यु अवंतिका को. ऑप. हौसिंग सोसायटी, राजाजी पथ, म्हात्रे नगर, डोंबिवली पूर्व –४२१२०१ माझे **फ्लॅटचे** मुळ शेअर सर्टिफिकेट व इतर झेरॉक्स कागदपत्रे गहाळ झालेले आहेत. त्याचे विवरण खालील प्रमाणे आहे.

**फ्लॅट** नं. अे-04, न्यु अवंतिका को. ऑप. हौसिंग सोसायटी, राजाजी पथ, म्हात्रे नगर, डोंबिवली पूर्व–४२१२०१ अशी मिळकत असून सदर 'न्यू अवंतिका को ऑप. हौ. सो. लि. (रजि. नं. टीएनए/ केएलएन/एचएसजी / (टीसी) / ६५५६-९३ दि. ३१ .१२.९३ ) मधील माझ्या नावाचे शेअर सर्टीफिकेट (प्रमाणपत्र) क्र. २९ चे ०५ शेअर त्याचे क्र. १४१ ते १४५.

सदर मुळ शेअर सर्टिफिकेट माझेकडून नजरचुकीने गहाळ झाले आहेत. त्याकरीता दि. २९/०८/२०२१ रोजी रामनगर पोलीस स्टेशन, ता कल्याण यांचेकडून सदर कागदपत्रे गहाळ झाल्याबाबतचा दाखला घेतलेला आहे.

वरील प्रमाणे नमुद केलेले शेअर सर्टिफिकेट गहाळ झालेले आहेत आणि बरेच प्रयत्न करून आणि शोधून सदर शेअर सर्टिफिकेट सापडत नाहीत. तरी सर्वांना असे कळविण्यात येते आहे की, कोणालाही सदर कागदपत्रे मिळाल्यास त्यांनी माझ्या खालील नमूद केलेल्या पत्त्यावर मला आणून दयावे किंवा मला भ्रमणध्वनीवर संपर्क करावे.

तरी, सदर बाब आम जनतेच्या माहितीसाठी नोटीसी अंतर्गत देण्यात येत आहे.

सहि/–
श्रीमती शांतीबा रतनसिंह जाडेजा
कल्याण — अे-०४, न्यु अवंतिका को. ऑप. हौसिंग सोसायटी,
दि. ०६/०९/२०२१ — राजाजी पथ, म्हात्रे नगर, डोंबिवली (पूर्व) –४२१२०१.

---

**गाडी ट्रान्सफर**

जाहीर नोटीस

लोकांच्या माहीतीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, ठाणे मध्ये समाविष्ट असलेल्या **गाडी क्रं. MH04-JK-7686, MH04-JK-7685**, चे मालक **दलजीत सुरजीत सिंह** यांचे दिनांक ०७/०३/२०२० रोजी निधन झालेले आहे.

सदर गाड्या त्यांचे वारसदार त्यांची पत्नी **प्रीतम कौर दलजीत सिंह** उपरिलेलखित वाहनांच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर गाड्यांचा वापर करण्याचा माझा इरादा आहे आणि त्यानुसार त्या गाड्यांचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे यांचेकडे अर्ज केलेला आहे.

याबाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे यांच्या निदर्शनास आणुन दिली पाहिजे.

सही /-
**प्रीतम कौर दलजीत सिंह**
**डी-६/१०४, माधव सृष्टी, गोदरेज हिल रोड,**
**खडकपाडा, कल्याण (प.)**
**मो.: ९१६७६१६६२०**

---

## CLASSIFIEDS ठाणेवैभव

**छोट्या जाहिरातींसाठी संपर्क कार्यालय**
**ठाणे - २५३४१५२६/२५३४८५९४**

**विकणे आहे**

**टेंभी नाका परिसरात २०० आणि २५० चौ.फूटाचा बेसमेंट गाले विकायला आहे.**
**संपर्क – ९८१९२४९२८०**

**FLAT FOR SALE**

**Very Urgent**
- 1 BHK
- Lodha Amara
- Semi Furnished
- Carpet 472 sqft
- Higher floor
- Price 75 lacs Negotiable
- Contact Nikita Realty

8355810336 / 8879718231

**REQUIRED**

URGENTLY required trained/untrained Teachers for Sanskrit and French subject attractive salary, Cont. Symbiosis Convent High School Kausa Mumbra, Walk in int. from 7/9/21 to 9/9/21- 11.00am to 01.00pm. 9136950844/9136950806 or email ID: schstrust@rediffmail.com

**VACANCY FOR OFFICE AT TEEN HATH NAKA ,THANE**

-senior architectural draftsman expert in designing municipal and working drawing
- Civil Engineer who is able to do estimate, attend meetings, read architectural drawings, able to handle site.
Pl send CV on **8433777606** by whatsapp or mail to

**aw.archinova@gmail.com**

**हात स्वच्छ धुवा कोरोना टाळा**

**'ठाणेवैभव' दैनिकातील जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुरानुसार छापल्या जातात. या मजकुराच्या सत्यतेबाबतची खातरजमा वाचकांनी स्वतःच्या जबाबदारीवर करावयाची आहे. 'ठाणेवैभव' यांचा याबाबत कोणतीही आर्थिक वा कायदेशीर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष जबाबदारी राहणार नाही.**

# कल्याण-डोंबिवली वैभव



आम्हा घरी धन | शब्दांचीच रत्ने | शब्दांचीच शस्त्रे | यत्ने करु ||

## शहरीकरणाने पुसली पूररेषा

जवळ नदी नाही, समुद्र आणि खाडीचे पात्र तर त्याहूनही दूर, असे असताना अनेक शहरांना या पावसाळ्यात पूरपरिस्थितीस सामोरे जावे लागले. नालेसफाईवर खापर फोडून काही मंडळी हात झटकून मोकळी झाली. पण तसे करणे स्वत:ची आणि जनतेची फसवणूक करण्यासारखे ठरेल. पूराचे मुख्य कारण आणि त्यावर उपाय शोधण्याचे प्रयत्न त्यामुळे होताना दिसत नाहीत. हा अनुभव सध्या बदलापूरकर घेत आहेत. या शहरास यंदाच्या पावसाळ्यात पुराच्या पाण्याने दोनदा वेढले होते आणि ही समस्या वाढत्या नागरीकरणामुळे अधिकच गंभीर होत जाणार आहे.

बदलापूरलगत वाहणाऱ्या उल्हास नदीला पूर आला की ते पाणी शहरात शिरते. यामुळे नागरीकांच्या डोक्यावर सदैव टांगती तलवार असते. पुरामुळे गेल्या तीन वर्षांत नागरीकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. अनेकांनी या त्रासाला कंटाळून घरे विकून टाकली आहेत.

बदलापूरला १६ वर्षांपूर्वी म्हणजेच २००५ साली पुराचा पहिला तडाखा बसला. त्यानंतर पूर येण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. याचे प्रमुख कारण पुराचा अभ्यास करून तयार करण्यात आलेल्या निळ्या आणि लाल पूररेषांचे उल्लंघन. या रेषा निश्चित करताना सुमारे शंभर वर्षांचा अभ्यास करण्यात आला होता. उल्हासनदीच्या परिक्षेत्रात कर्जत, नेरळ, वांगणी, बदलापूर तसेच कल्याण तालुक्याचा ग्रामीण भाग येतो. उल्हासनगर शहरही प्रभावक्षेत्रात येते. एकीकडे अभ्यास आणि पूररेषा निश्चितीचा प्रक्रिया सुरू असताना बदलापूर परिसरात, विशेषत: पश्चिम बदलापूरमध्ये नवीन बांधकामांचे पेव फुटले होते. ठाणे-मुंबईत ज्यांना घरे परवडत नव्हती त्यांनी आपला मोर्चा बदलापूर-अंबरनाथ ते थेट आटगाव-खर्डी-आसनगाव-वाशिंद-नेरळपर्यंत नेला. मागणी वाढू लागल्यावर बिल्डरमंडळी मिळेल तेवढे भूखंड विकत घेऊ लागले आणि पूररेषेची ऐसीतैशी झाली. दरम्यान निसर्ग त्याचे काम करीत राहिला. किंबहुना हवामान बदलामुळे तो अधिकच विचित्र वागू लागला आणि पूररेषेचे महत्व ठसठशीतपणे अधोरेखित झाले. अर्थात पूरप्रवण भागात ९५ टक्के बांधकामे पूर्णत्वाला गेली आहेत आणि निसर्गरम्य घराचे स्वप्न निसर्गाच्या अवकृपेमुळे नष्ट होण्याची लक्षणे आहेत.

शहरीकरण थांबू शकत नाही, ते अपरिहार्य आहे. परंतु म्हणुन नियम पायदळी तुडवण्याचे समर्थन होऊ शकत नाही. बदलापूरमध्ये नेमके हे झाली आहे. शहरविकासातील महत्वाच्या अटीचे विस्मरण बदलापूरकरांना भारी पडू लागले आहे.

# पुणे-वडोदरा मार्गातील बाधित चाळकऱ्यांच्या तोंडाला पुसली पाने

## विधानसभेतील आदेशाला प्रशासनाची केराची टोपली



**कल्याण : कल्याण नजीकच्या बल्याणी, नांदप, बनेली या भागातून जाणाऱ्या वडोदरा-पुणे महामार्गासाठी जमीन संपादित करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली असून या मार्गात या परिसरातील सुमारे 2000 चाळी बाधित होत आहेत. या चाळकऱ्यांनी 10 ते 12 वर्षांपूर्वी या परिसरातील चाळीत घरे खरेदी केली होती, मात्र आता शासनाकडून या चाळकर्यांना मोबदला देण्याऐवजी जागा मालकांनाच घरटी मोबदला दिला जात असल्याने चाळकरी हवालदिल झाले आहेत.**

**2019 मध्ये याप्रकरणी विधानसभेत आमदार रवींद्र फाटक, आमदार जगन्नाथ शिंदे यांनी मांडलेल्या लक्षवेधीत मोबदला थेट चाळकऱ्यांना देण्याचे आदेश विधानसभा अध्यक्ष रामराजे निंबाळकर यांनी दिला होता. मात्र तरीही या आदेशाची पायमल्ली करत जागामालकाचे कल्याण करण्याचा घाट प्रांताधिकाऱ्यांनी घातल्याचा आरोप स्थानिक नगरसेविका नमिता पाटील यांनी केला आहे. या चाळकऱ्यांना त्यांच्या हक्काचा मोबदला द्या अन्यथा त्यांच्या हक्कासाठी प्रांताधिकारी कार्यालयासमोर उपोषण छेडणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.**

आपल्या घराचा मोबदला आपल्याला मिळाला म्हणजे आपण घरे रिकामी करण्यास तयार असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. बल्याणी, बनेली परिसरातून जाणाऱ्या वडोदरा-पुणे या बहुचर्चित महामार्गासाठी जागा संपादन करण्यासाठी बाजारभावानुसार जमीन खरेदी प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेल्या सर्व्हेनुसार प्रत्येक चाळीतील घरासाठी 7 ते 8 लाख याप्रमाणे 28 कोटी 28 लाख रुपयाचा मोबदला ठरविण्यात आला आहे.

या प्रकल्पात या परिसरातील सुमारे 2000 चाळकरी बाधित होत असून या चाळकऱ्यांना घरे रिकामी करण्यासाठी जागा मालकाकडून दबाब आणला जात आहे. मात्र प्रकल्पासाठी जाणाऱ्या आपल्या घराचा शासनाकडून मोबदला दिल्यानंतरच आपण घरे सोडू अशी भूमिका घेतली आहे. मात्र तत्पूर्वीच कल्याण प्रांताधिकारी कार्यालयातून चाळकऱ्याऐवजी जागा मालकालाच संपूर्ण मोबदला देण्यात आला आहे.

आता जागामालक प्रत्येक चाळकऱ्याची 3 ते 4 लाखांत बोळवण करत हाकलण्याच्या तयारीत आहे. मात्र ज्या घराची घरपट्टी आणि वीजबिल आपल्या नावावर असताना आणि सर्व्हेमध्ये आपल्या नावाचा उल्लेख असताना आपला मोबदला आपल्याला का देण्यात आला नाही, असा रहिवाशाचा सवाल आहे.

दरम्यान जागेचा मोबदला लाटण्यासाठी चाळकऱ्यांच्या खोट्या सह्यांचे निवेदन सादर करत सक्रीय झालेल्या दलालाच्या मदतीने जागामालकांनी हा मोबदला लाटला असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे.

याप्रकरणी प्रांताधिकारी अभिजित भांडे पाटील यांनी या चाळीची रजिस्टर नोंदणी नसून केवळ नोटरी पद्धतीने नोंदणी केलेली आहे. नोटरी ग्राह्य धरता येत नसल्याने आपण जागामालकाकडे मोबदला दिला असून जागामालकाकडून या रहिवाशांच्या पुर्नवसनासाठीचे हमीपत्र लिहून घेतले आहे. यामुळे जर जागामालक रहिवाशांची फसवणूक करत असेल तर रहिवाशांनी तक्रार करावी, जागामालकाला समोर सुनावणी घेत हा प्रश्न निकाली काढला जाईल असे सांगितले, मात्र नोटरी पद्धतीच्या चाळीतील घरासाठी चाळकऱ्यांना मोबदला दिला जावा असे स्पष्ट आदेश विधानसभेचे असतानाही अधिकाऱ्यांनी जागामालकाच्या हिताचा निर्णय घेतल्याने अशा अधिकाऱ्यावर तातडीने कारवाई करण्याची मागणी नगरसेविका नमिता पाटील यांनी पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

या प्रकल्पात आदिवासींची देखील जागा जात असून त्यांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेत या सर्व प्रकियेत मोठ्या प्रमाणात दलाल सक्रीय असून गोर गरीब आदिवासींची देखील फसवणूक केली जात आहे.

## शिक्षक दिनाचे औचित्य साधत शिक्षक गेले विद्यार्थ्यांच्या घरी



**कल्याण : भारतात गुरु-शिष्य परंपरा आणि संस्कृती अनेक वर्षापासून चालून आलेली आहे. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिनाचे औचित्य साधत पाली भाषा प्रचार आणि प्रसार ट्रस्ट संचलित सम्राट अशोक विद्यालयात शिक्षक दिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी शाळेचा माजी विद्यार्थी डॉ.विनीत माळगावे उपस्थित होता.**

विनीत माळगावे यांनी ऑनलाईन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. मी याच शाळेत शिकलो. माझ्या गुणवत्तेने मी जे. जे. मेडिकल कॉलेजला एमबीबीएस केले. आता नायर मेडिकल कॉलेजला एमडी करीत आहे. मला माझ्या शिक्षकांचं, आई-वडिलांचे मार्गदर्शन लाभलं. मुलांनो तुम्ही जरी मराठी माध्यमाची मुले असलात तरी नाराज होऊ नका. मेहनत, जिद्द, चिकाटीने तुम्ही आवड असलेल्या क्षेत्रात नक्कीच जाल. मराठी माध्यमाची मुलेसुद्धा डॉक्टर, वकील, अधिकारी झाले आहेत, आताही होत आहेत. आपण आई-वडील व शिक्षकांशी प्रामाणिक राहा. त्यांना फसवू नका. तुम्हाला यश मिळणार असेही सांगितले.

कार्यक्रम संपल्यावर शाळेचे मुख्याध्यापक गुलाबराव पाटील यांच्यासह गणेश पाटील, ओमप्रकाश धनविजय या शिक्षकांनी जी मुले ऑनलाइन तासांना हजर राहत नाहीत, शिक्षणापासून वंचित आहेत अशा मुलांच्या घरी भेट दिली. त्यांच्या अडचणी समजून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शासन निर्णय शिक्षण विभागाच्या आदेशान्वये विद्यार्थ्यांकरिता माझा शिक्षक माझा प्रेरक, कोविड कालावधीतील शिक्षकाची भूमिका, उपक्रमशील शिक्षक या विषयावर निबंध स्पर्धा व आधुनिक काळामध्ये शिक्षकाची बदललेली भूमिका, देशाच्या जडणघडणीमध्ये शिक्षकांचे योगदान व शिक्षक समाज परिवर्तनाचे माध्यम या विषयांवर ऑनलाईन वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

कार्यक्रमाला सचिन धनविजय, विद्या कांबळे यांच्यासह चेतन धिंदळे, हर्षल बेंडकुळे, कृष्ण महेंद्रकर या विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

## डोंबिवलीत म्हाडाची २० हजार घरे बांधण्याचा प्रस्ताव

### गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांचे डोंबिवलीत प्रतिपादन

**डोंबिवली : प्रीमियम कंपनीच्या समोर असलेल्या म्हाडासाठी आरक्षित जागेत 20 हजार घरे बांधण्याचा प्रस्ताव तातडीने तयार करण्याचे निर्देश म्हाडाच्या अधिकाऱ्यांना दिल्याचे सांगितले आहे असे प्रतिपादन गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड यांनी डोंबिबलीत केले.**

गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी डोंबिवलीत रोहित सामंत यांच्या पक्ष कार्यालयाच्या उद्घाटनासाठी डोंबिवलीत हजेरी लावली. यावेळी व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष आप्पा शिंदे, ठाणे जिल्हा समन्वयक आनंद परांजपे, महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, महेश तपासे, गुलाब वझे, डोंबिवली अध्यक्ष सुरेश जोशी यांच्यासह हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

जावेद अख्तर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर केलेल्या तालिबानी सरकारच्या आरोपावर संघाकडून अख्तर यांनी माफी मागण्याच्या विनंतीवर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा दाखला देत खिल्ली उडवली. तर इन्फोसिसवर पांचजन्य साप्ताहिकाच्या लेखात करण्यात आलेल्या आरोपावर बोलताना त्यांनी इन्फोसिस देशाला किती महसूल मिळवून देते याचा विचार केल्यास कोणी असा आरोप करणार नसल्याचेही त्यांनी सांगितले.

कोरोना काळात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाची तोंडभरून स्तुती केली.

# कल्याण पूर्वेतील रचना पार्क सुंकलात घरगुती गॅसवाहिनी नागरीकांच्या घरात

### नगरसेवक महेश गायकवाड यांच्या प्रयत्नांना यश



**कल्याण: कल्याण पूर्वेतील संतोष नगर प्रभाग क्र. 88 मधील रचना पार्क संकुलातील सुमारे साडेतीनशे नागरीकांच्या स्वयंपाक गृहापर्यंत महानगर गॅस कंपनीचा घरगुती गॅस नगरसेवक महेश गायकवाड यांच्या पाठपुराव्याने पाईपलाईनद्वारे पोहचवण्यात आला आहे. ऐन गणेशोत्सवाच्या सणासुदीलाच हा गॅस घरात आल्यामुळे या गॅसच्या लाभार्थी महिलांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.**

केंद्र शासनाच्या योजने अंतर्गत सुमारे सातशे कुटूंबियांचे गृह संकुल असलेल्या रचना पार्क गृह संकुलाच्या इमारतींमध्ये गेल्या तीन वर्षांपूर्वी महानगर गॅस कंपनीने घरगुती वापरातील गॅससाठी प्रत्येकाच्या स्वयंपाक घरात वाहिनी जोडून ठेवली, परंतु प्रत्यक्ष गॅसपुरवठा काही सुरु होत नव्हता. या बाबत सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी ही बाब नगरसेवक महेश गायकवाड यांच्या निदर्शनास आणू देताच महेश गायकवाड यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून सदरचा गॅस पुरवठा त्वरीत सुरु होणेकामी संबंधीत अधिकाऱ्यांकडे साततने पाठपुरावा केला. यामुळे सुमारे 350 कुटूंबियांचा गॅस पुरवठा सुरु करण्यात आला आहे.

या गॅस वितरण योजनेचा शुभारंभ महेश गायकवाड यांचे हस्ते करण्यात आला. टप्प्या टप्प्याने संपूर्ण परिसरातील गृह संकुलातील नागरीकांना या गॅस वितरण योजनेचा लाभ होणार असल्याचे महेश गायकवाड यांनी या वेळी सांगितले. यावेळी शाखा प्रमुख प्रशांत बोटे, निलेश रसाळ, हनुमंत देसाई, शशिकांत गवळी, कृष्णा पाटील, चेतन परब, डॉ. रवींद्र जाधव, तसेच उपविभाग प्रमुख शंकर पाटील, महिला उपविभाग प्रमुख वंदना तांबे, निलेश रसाळ, सुरेश रसाळ तसेच शिवसैनिक, पदाधिकारी उपस्थित होते.

# शिवसेना पदाधिकाऱ्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

### निवडणुकीआधी वातावरण तापले



**कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या आधी येथील राजकीय वातवरण चांगलेच तापले असून ठाणे जिल्हा संपर्कमंत्री गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड व राष्ट्रवादीचे ठाणे जिल्हा संपर्क अध्यक्ष आनंद परांजपे यांच्या हस्ते राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस राष्ट्रीय सरचिटणीस तथा महाराष्ट्र प्रदेश कोकण विभाग अध्यक्ष किरण शिखरे यांच्या नेतृत्वाखाली कल्याणमधील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने शिवसेनेला दुसऱ्यांदा खिंडार पडले आहे. या आधी देखील युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे.**

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असले तरी कल्याण डोंबिवलीमध्ये या महाविकास आघाडीत निवडणुकीच्या आधी फुट पडण्याची चिन्हे दिसत आहेत. याचे कारणही तसेच असून शिवसेनेचे माजी विभागप्रमुख दीपक काळे व त्यांचे पंचवीस सहकारी पदाधिकारी यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केल्याने निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर फोडाफोडीच्या राजकारणाला जोर आला आहे. राष्ट्रवादीच्या मेळाव्यात जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी देखील आगामी केडीएमसी निवडणूक स्वबळावर लढविण्याचे भाष्य केले. त्यांच्या या वक्तव्याला गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी देखील सहमती दर्शविल्याने कडोंमपा निवडणुकीत महाविकास आघाडीमधून शिवसेना आणि राष्ट्रवादीचा काडीमोड निश्चित मानला जात आहे.

राष्ट्रवादीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा जलसंपदामंत्री जयंत पाटील, गृहनिर्माण मंत्री तथा ठाणे जिल्हा संपर्क मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा सोनिया दुहान, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुनील गव्हाणे, राष्ट्रवादी युवती काँग्रेस मुंबई अध्यक्ष आदिती नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण पश्चिम येथील शिवसेनेच्या माजी पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये माजी खासदार तथा राष्ट्रवादीचे ठाणे जिल्हा संपर्क अध्यक्ष आनंद परांजपे यांच्या हस्ते कल्याण पश्चिम विधानसभा येथील शिवसेनेच्या माजी विभाग प्रमुख दीपक काळे व त्यांचे पंचवीस सहकारी पदाधिकारी यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस कल्याण शहर अध्यक्ष निखिल कदम यांच्या माध्यमातून घेण्यात आला असल्याची माहिती व राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस राष्ट्रीय सरचिटणीस तथा महाराष्ट्र प्रदेश कोकण विभाग अध्यक्ष किरण शिखरे यांनी दिली.

राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या विचारांच्या प्रेरणेने शिवसेनेतील पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला असून येणाऱ्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नव्या ताकतीने उभा राहील. कल्याण-डोंबिवली येथे पक्षसंघटन मजबूत होईल यात तिळमात्र शंका नसल्याचे शिखरे यांनी सांगितले. यावेळी कल्याण डोंबिवली विद्यार्थी अध्यक्ष सुजित रोकडे, जिल्हा कॉर्डिनेटर सुजित पवार, जिल्हा सरचिटणीस जयेश भोईर, शहर सचिव तिजो क्रिश्चन आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कल्याणमध्ये १३८ निरंकारी भक्तांचे उत्साहपूर्ण रक्तदान

**कल्याण: संत निरंकारी सत्संग भवन, कोनगाव, कल्याण (पश्चिम) येथे संत निरंकारी मिशनच्या वतीने रविवारी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरामध्ये 138 निरंकारी भक्तांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले. या शिबिरामध्ये रक्त संकलनाचे कार्य संत निरंकारी रक्तपेढीकडून पार पाडण्यात आले.**

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन मंडळाचे डोंबिवली झोनचे प्रभारी रावसाहेब हसबे, कोनगाव ग्रामपंचायतचे उपसरपंच राजेश मुकादम, कल्याण सेक्टर संयोजक जगन्नाथ म्हात्रे यांच्याहस्ते संयुक्तरीत्या दीपप्रज्वलीत करून करण्यात आले. या शिबिराला सदिच्छा भेट देणाऱ्या मान्यवरांमध्ये पंचायत समिती सदस्य दर्शन म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य कमलाकर नाईक, डॉ. अमोल कराळे, शिवसेना विभाग प्रमुख प्रल्हाद राखाडे, बुर्दुल ग्रामपंचायत सरपंच सुनील पाटील, समाजसेवक नंदू राखाडे आदी मान्यवरांचा सहभाग होता. मंडळाच्या विविध शाखांचे मुखी तसेच सेवादलाचे अधिकारी यावेळी आवर्जून उपस्थित होते.

मंडळाची सामाजिक कार्ये सांभाळणाऱ्या संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या माध्यमातून या शिबिराचे आयोजन मंडळाचे स्थानिक सेक्टर संयोजक जगन्नाथ म्हात्रे आणि स्थानिक सेवादल संचालक प्रकाश कोकतरे यांनी स्थानिक सेवादल युनिट स्वयंसेवकांच्या सहकार्याने केले.



पान १ वरुन

## स्थायी समितीत सर्वपक्षीय 10 सदस्यांचे राजीनामे

स्थायी समितीतील नवीन सदस्य





सुधीर कोकाटे, उमेश पाटील, संतोष वडवले, मिनल संख्ये, अनिता गौरी आणि मधुकर पावशे, भाजपच्या वतीने मिलिंद पाटणकर, सुनेश जोशी आणि अर्चना मणेरा तर राष्ट्रवादीकडून सुहास देसाई यांना स्थायी समितीत सदस्य म्हणून संधी देण्यात आली आहे. ठाणे महापालिकेची निवडणूक सहा ते सात महिन्यांवर असून सर्वच पक्षातील नाराजी दूर करण्यासाठी हे राजीनामे देण्यात आल्याचे कळते. स्थायी समितीची मुदत संपली असल्याने कोरोनामुळे ही निवडणूक घेता आलेली नाही. नवीन सदस्यांना किमान अर्धा वर्ष स्थायी समितीत काम करण्याची संधी मिळणार आहे.

## पिंपळे यांचा खटला फास्ट ट्रॅकवर चालणार; ठामपा महासभेत ठराव

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त कल्पिता पिंपळे यांच्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या आरोपीस कठोर शासन व्हावे अशी मागणी जोर धरत असतानाच हा खटला जलदगतीने चालवण्यात यावा असा ठराव सोमवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत घेण्यात आला आहे.

जखमी सहाय्यक आयुक्त पिंपळे यांच्यवर हल्ला झाल्यानंतर त्यांच्या पाठीशी लोकप्रतिनिधींनी उभे राहण्याचा निर्णय घेतला. या सर्व प्रकाराची दखल वरिष्ठ पातळीवर घेण्यात आली. सभागृहात चर्चा होते आणि त्यानंतर त्या प्रकरणाचा पाठपुरावा केला जात नाही. पिंपळे यांच्यावरील हल्ला हा त्यांच्यवर असून ठाणे महापालिकेवर हा हल्ला असल्याचे मत मांडून पिंपळे यांचा खटला फास्ट ट्रॅकवर चालवण्याची घोषणा महापौर नरेश म्हस्के यांनी यावेळी केली.

### पालकमंत्री-केंद्रीय राज्यमंत्र्यांच्या हस्ते जि.प.च्या आदर्श शिक्षक पुरस्कार

# शिक्षकांच्या समस्या प्राधान्याने सोडवल्या जातील-पालकमंत्री

**ठाणे :** शिक्षकांच्या समस्या प्राधान्याने सोडविल्या जातील, अशी ग्वाही राज्याचे नगरविकास मंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. तर काळानुरुप बदलत जाणारी शिक्षण व्यवस्था अंगिकारून विद्यार्थी घडविण्याचे काम शिक्षकांनी करावे, असे आवाहन केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांनी यावेळी केले.

येथील मो. ह. विद्यालयाच्या सभागृहात जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष श्रीमती पुष्पा पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भाऊसाहेब दांगडे, जि. प. उपाध्यक्ष तथा अर्थ व शिक्षण समिती सभापती सुभाष पवार, महिला व बालकल्याण समिती सभापती श्रेया गायकर, कृषी विभाग सभापती संजय निमसे, शिक्षण समिती सदस्य सुषमा लोणे, जि.प. सदस्य, अधिकारी, कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, चांगले काम करणाऱ्याच्या पाठीवर शाबासकी देण्याचं काम पुरस्काराच्या माध्यमातून केलं जातं. शिक्षकांचं आपल्या आयुष्यात अनन्यसाधारण महत्व असून आई-वडिलांच्या बरोबरीने शिक्षकांकडून विद्यार्थ्यांवर संस्कार केले जातात. चांगले शिक्षक मिळाले तर आयुष्याला वळण मिळते. महापालिकेच्या शाळेचा विद्यार्थी ते राज्याचा नगरविकास मंत्री इथपर्यंतचा प्रवास शिक्षकांमुळे झाल्याचे सांगतानाच त्यांच्या ऋणातून उतराई होऊ शकत नसल्याचे मंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी आर्वजून सांगितले.

यावेळी ठाणे जि.प. अध्यक्षा पुष्पा पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. दांगड आणि इतर मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. जि.प.चे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी संतोष भोसले यांनी आभार मानले.



**शिक्षकांनी आपले योगदान देऊन विद्यार्थी घडवताना त्या गावाचा विकास आणि पर्यायाने तालुक्याच्या विकासात सहभागी होण्याचे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी केले. ठाणे जिल्ह्यातील ग्रामपंचायतींसाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाहीही श्री. पाटील यांनी यावेळी दिली.**

2019-20 पुरस्कार प्राप्त शिक्षक लक्ष्मण कारवे, जि.प.शाळा, चिराडपाडा, भिवंडी, राणु बनसोडे, जि.प.शाळा चिकण्याची वाडी, अंबरनाथ, माधुरी सुरोशे, जि.प.शाळा कोंढरी, कल्याण, दिपक पाटोळे, जि.प.शाळा फांगळोशी, मुरबाड, रविंद्र भोईर, जि.प.शाळा कुंडणपाडा, शहापूर, **2020-21 पुरस्कार प्राप्त शिक्षक:** ज्ञानेश्वर काठे, प्राथमिक शिक्षक जि.प.शाळा मालोडी, भिवंडी, कालप्पा होटकर, प्राथमिक शिक्षक जि.प.शाळा काकोळे, अंबरनाथ, अनंत केदार, पदवीधर शिक्षक, जि.प.शाळा म्हसकळ, कल्याण, एकनाथ देसले, प्राथमिक शिक्षक जि.प.शाळा देवगांव, मुरबाड, चंद्रकांत पाटील, प्राथमिक शिक्षक जि.प.शाळा, शेंद्रुण, शहापूर. यावेळी राज्यस्तरीय पुरस्कार विजेते चंदाराणी कुसे आणि डॉ. गंगाराम ठमके यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.

कोरोना काळात चांगले काम करणारे कोविड योद्धे म्हणून जयवंत भंडारी, प्राथमिक शिक्षक जि.प.शाळा ब्राम्हणगाव, भिवंडी, सत्यवान शिरसाट, प्राथमिक शिक्षक, जि.प.शाळा खुटारवाडी, मुरबाड, अलंकार वारघडे, प्राथमिक शिक्षक, जि.प.शाळा, खरशेत, मुरबाड, योगेंद्र बांगर, जि. प. केंद्र शाळा, मुरबाड, अजय पाटील, प्राथमिक शिक्षक, जि.प. शाळा, राहनाळ, भिवंडी, विद्या शिर्के, प्राथमिक शिक्षक, जि.प. शाळा, तळेखल, मुरबाड, प्रमोद पाटोळे, प्राथमिक शिक्षक, जि.प.शाळा, वाऱ्याचापाडा, शहापूर, नटराज मोरे, प्राथमिक शिक्षक जि.प.शाळा, गोळवली, कल्याण, पंकज चव्हाण, जनसंपर्क अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचा सत्कार करण्यात आला.

# कंत्राटी कामगार फेरीवाल्यांच्या पे रोलवर

### महापौर नरेश म्हस्के यांचा खळबळजनक आरोप

**ठाणे :** फेरीवाल्यांकडून अतिक्रमण विभागातील कंत्राटी कर्मचारी हप्ते वसूल करतात असा खळबळ जनक आरोप महापौर नरेश म्हस्के यांनी महासभेत केला.

15 वर्ष वास्तव्याचा पुरावा केवळ 250 फेरीवालेच सादर करु शकले. 99 टक्के फेरीवाले हे बाहेरचे असल्याची माहिती महापौर नरेश म्हस्के यांनी दिली. फुटपाथ आणि रस्ते अडवून बसणारे सर्व फेरीवाले हे अनधिकृत असून अशा फेरीवाल्यांवर कारवाई करताना जुने आणि नवीन फेरीवाले असे न पाहता सर्व फेरीवाल्यांवर कारवाई करण्याचे आदेश महापौर नरेश म्हस्के यांनी दिले.



युनियनवाल्यांमुळे फेरीवाले वाढले, तर हप्तेखोरीमुळे फेरीवाले वाढल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. त्यातही फेरीवाला समिती बरखास्त करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करावी अशी मागणी करीत यावर कायमचा तोडगा काढण्याची मागणी सर्वपक्षीय सदस्यांनी केली.

फेरीवाल्यांकडून दररोज 500 रुपयांचा हप्ता घेतला जात असल्याचा आरोपही विक्रांत चव्हाण यांनी केला. कारवाई करण्यासाठी जात असतांना आधीच फेरीवाल्यांना फोन जातात. नगरसेवकाने तक्रार केली तर त्याची माहिती आधीच मिळते, असा आरोप विकास रेपाळे यांनी केला.

याला जबाबदार हे प्रशासनातील अधिकारी देखील असल्याने अशा यंत्रणेवर कारवाई करणे गरजेचे असल्याचे मत नगरसेवक हणमंत जगदाळे यांनी व्यक्त केले. फेरीवाला धोरणाबरोबर शहरातील ॲमीनीटी प्लॉट असतील त्या ठिकाणी मार्केट उभारण्याची गरज असल्याचे मत नगरसेवक नजीब मुल्ला यांनी व्यक्त केले. फेरीवाल्याला जागा देणारे दुकानदार देखील यात दोषी आहेत, त्यामुळे केवळ एकाला दोष देऊन चालणार नसून कारवाई ही अशा सर्वांवरच होणो अपेक्षित असून फेरीवाला समिती बरखास्त करण्याची मागणी त्यांनी केली. तर भाजपचे नगरसेवक नारायण पवार आणि मिलीद पाटणकर यांनी देखील फेरीवाल्यांमध्ये मोठे रॅकेट सक्रीय आहे, त्यामुळे तक्रार करतांनाही भिती वाटते उद्या आपल्यावर हल्ला होईल अशी शंका वाटत असल्याचे त्यांनी सांगितले. तर भाजपचे गटनेते मनोहर डुंबरे यांनी देखील याला आपणही स्वत: जबाबदार असून आपल्यापैकी किती जणांची ऑफीसेस अनाधिकृत आहेत, याचा विचार करावा, त्यांनी आधी ती कार्यालये तोडून एक आर्दश निर्माण करावा, आपणच ठरविले तर प्रभागात कुठेही अशा पध्दतीने फेरीवाले बसणार नाहीत, त्यामुळे अशी पावले उचलणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.





शाखाप्रमुख राम (भाऊ) ऐंकुरे यांच्यावतीने वर्तकनगर श्री विनायक सोसायटी 5/38 भ. ह. ब. कॉलनी वर्तकनगर पोलीस स्टेशन रोड, विठ्ठल मंदिर जवळ, 'इबोलुशन फिटनेस सेंटर'चे भव्य उद्घाटन पालकमंत्री एकनाथ शिदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी महापौर नरेश म्हस्के, आ. रविंद्र फाटक, दिनेश पैठणकर, नगरसेविका विमल भोईर, विभागप्रमुख राजेंद्र फाटक, ज्येष्ठ नगरसेवक हणमंत जगदाळे, नगरसेविका राधाबाई जाधवर आणि वर्तकनगर येथील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छाया:रामसिंह

## सोसायट्यांतील कचऱ्याचे वर्गीकरण करण्यासाठी अवधी मिळावा

### मनसे आमदार पाटील यांची मागणी

**अंबरनाथ:** शहरातील कचऱ्याच्या वर्गीकरण समस्येवरुन अंबरनाथला मनसेनेही आक्रमक भूमिका घेतली आहे. याबाबतीत नागरिकांना थोडा अवधी द्यावा, जबरदस्ती करू नये, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने आज करण्यात आली.



मनसे आमदार राजू पाटील यांनी शहरातील मोठ्या गृहसंकुलांतील कचरा उचलण्यावरून निर्माण झालेल्या समस्येबाबत नगरपालिका मुख्याधिकारी डॉ. प्रशांत रसाळ यांच्याशी आज सोमवारी चर्चा केली. मनसे शहराध्यक्ष कुणाल भोईर, जिल्हा संघटक संदिप लकडे, सरचिटणीस अविनाश सुरसे, देशमुख यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

कचरा उचलण्यावरून नगरपालिकेला नियमित कर भरणाऱ्यांना त्रास देऊ नका, त्यांच्यावर दबाव टाकू नका, त्यांना अवधी दिल्यास सोसायटीधारक कचरा वर्गीकरण आणि अन्य प्रक्रिया करण्याचा प्लांट उभा करतील, असा विश्वास आमदार पाटील यांनी मुख्याधिकारी डॉ. रसाळ यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान व्यक्त केला.

# यापुढे बेकायदेशीर इमारतीच्या फाईलवर अधिकाऱ्याचे नाव

**ठाणे :** ज्या अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात अनधिकृत इमारत बांधली गेली, त्या अधिकाऱ्याचे नाव संबंधित इमारतीच्या फाईलवर टाकण्यात येणार आहे. तसा ठराव आज झालेल्या महासभेत करण्यात आला.

भविष्यात ही इमारत पडली तर तत्कालीन सहायक आयुक्त यांनाच जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई करण्याचा निर्णय या ठरावात घेण्यात आला आहे. महापौर नरेश म्हस्के यांनी यासंदर्भात सभागृहात ही घोषणा केली आहे.




सोमवारी झालेल्या महासभेत विक्रांत चव्हाण यांनी अनधिकृत बांधकामांना पाठीशी घालणाऱ्यांच्या विरोधात ठराव करण्याची मागणी केली. मिलिंद पाटणकर यांनी देखील सहाय्यक आयुक्तांच्या बदल्या झाल्यानंतर त्या त्या प्रभाग समितीत कारवाया झाल्या. परंतु केवळ बदल्या करुन या कारवाया झाल्या का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. आधी ज्या प्रभाग समितीत संबधीत सहाय्यक आयुक्त होता, त्यावेळेस त्याला ते बांधकाम दिसले नाही का? त्याने त्याच्यावर कारवाई का केली नाही? असा सवालही त्यांनी केला. एकूणच केवळ बदली करुन गुन्ह्यातून माफी देण्याचाच हा प्रकार असल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला. तर इतर सदस्यांनी देखील यावेळी चर्चा करुन अनधिकृत बांधकामांवर कारवाईची मागणी केली. तर गावठाण भागातील रहिवाशांना दुरुस्तीची परवानगी मिळत नसल्याने तेथील रहिवासी अशा प्रकारे बांधकामे उभारत असतात. त्यामुळे यावर कायमचा तोडगा काढण्याची मागणी यावेळी स्थायी समिती सभापती संजय भोईर यांनी केली.





संतोषी माता मंदिराजवळ, बी केबिन, नौपाडा ठाणे येथील युवकांनी हेमंत पवार शिवसेना ठाणे शहर प्रमुख (विधानसभा क्षेत्र) यांची रविवार 5 सप्टेंबर रोजी सदिच्छा भेट घेतली.

# ठाण्यात स्व. माँसाहेब मीनाताई ठाकरे स्मृतिदिन साजरा

**ठाणे:** शिवसेना उपनेते, माजी महापौर, आमदार, स्व.अनंत तरे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे येथील माँसाहेब मिनाताई ठाकरे चौकात 6 सप्टेंबर हा दिवस स्व. माँसाहेब मिनाताई ठाकरे यांचा स्मृतीदिन साजरा होत आला आहे. यंदाही स्व. माँसाहेब मिनाताई ठाकरे चौकातील असलेल्या मेघडंबरीमधील अर्धपुतळयास शिवसेना पदाधिका-यांच्या उपस्थितीत आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी गरीब-गरजूंना फळवाटप करण्यात आले.





सर्वप्रथम महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास शिवसेना ठाणे विधानसभा उप शहरप्रमुख चंद्रकांत सुर्वे व माजी नगरसेवक संजय तरे यांच्या हस्ते पुष्पहार हार अर्पण करुन दिप प्रज्वलन केले आणि माँ साहेब मिनाताई ठाकरे चौकात माँ चे स्मृतीदिन ज्यांनी सुरु केला ते शिवसेनेचे उपनेते स्व. अनंत तरे यांच्या तस्बीरीस राबोडीचे शाखाप्रमुख दिलीप वाळींबे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केल्यानंतर माँसाहेब मिनाताई ठाकरे यांच्या अर्धपुतळ्यास शिवसेना माजी नगरसेविका महेश्वरी तरे शिवसेना महिला आघाडी विभागप्रमुख नंदा कोथळे, राजश्री सुर्वे व महिला आघाडीच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर उपस्थित शिवसेना पदाधिका-यांच्या हस्ते फळवाटप करण्यात आले.

याप्रसंगी शिवसेना ठाणे विधानसभा उप शहरप्रमुख चंद्रकांत सुर्वे, माजी नगरसेवक अध्यक्ष राबोडी कोळीवाडा नागरिक संघटना संजय तरे, माजी नगरसेविका महेश्वरी तरे, शिवसेना महिला आघाडी विभागप्रमुख नंदा कोथळे, राबोडी शिवसेना शाखाप्रमुख दिलीप वाळींबे, वृंदावन शिवसेना शाखाप्रमुख किशोर सुर्वे, आझादनगर शिवसेना शाखाप्रमुख संतोष दंत, ज्येष्ठ शिवसैनिक महादेव शिंदे, माजी नगरसेवक एकनाथ काजारी, शिवसेना उप विभागप्रमुख रोहन दळवी, उप विभागप्रमुख वैभव झापकर, शिवसेना राजापुर शहर संपर्कप्रमुख सत्यवान कदम, उप शाखाप्रमुख प्रमोद पाटील, मंदार घोरपडे, श्रीकेश आंबाडे, अप्पा साळुंखे, दिलीप जयसिंगपुरे, महिला पदाधिकारी दर्शना शिंदे, राजश्री सुर्वे, कमल पांडव आदिंसह शिवसैनिक व युवा सैनिक उपस्थित होते.